# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना १९८१



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष ९ वे | जुलै–सप्टेंबर २०१४ | अंक २ रा



**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर** मो.नं ९३२६८२६८८४
**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर** मो.नं ९८५०९७९७०६
**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी** मो.नं ९४४९०५१६५३



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. गणेश गुर्जर**
९८९०९९०११३
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८
**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**
श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२–२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदुर्ग, ९४२३८९०१३८



**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com



**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKD0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |


**नियतकालिकाचे नाव :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक :** एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


| | |
|---|---|
| ४ | बकुळफुले - मूल्य |
| ५ | विज्ञान वार्ता |
| ७ | पत्रप्रतिसाद |
| ८ | व्यक्ति परिचय - म.मो. दत्तो वामन पोतदार |
| ९ | व्यक्ति परिचय - मालतीबाई पेंढारकर |
| ११ | झाशीवाली |
| १२ | पाककृती |
| १३ | कऱ्हाडे ब्राह्मण नमो नमः |
| १३ | ''चूक'' |
| १४ | काव्यसुमने |
| २० | महत्व दिवसांचे |
| २१ | चारोळ्या |
| २२ | मुखवटा |
| २४ | संस्थावृत्त |
| २६ | अभिनंदनीय |
| २७ | 'स्पर्श दिव्यत्वाचा' - नाट्यसंगीताचा बहारदार कार्यक्रम |
| ३० | 'त्याचे महत्व आता जाणवतंय....' |
| ३१ | मित्र आणि मैत्री |
| ३१ | कैलास मान सरोवर यात्रा |


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **– संपादक**

संपर्क



# संपादकीय

देशभरांत सर्वार्थाने लोकसभेच्या निवडणुकीत एक मोठे स्थित्यंतर पहावयास मिळाले. गेली दहा वर्षे देशातील जनता त्रस्त झाली होती व सरकारच्या निषेधांत मतदान करून मा. श्री. नरेंद्र मोदींना एक हाती सत्ता मिळवून दिली आता या सरकारने १ महिन्याचा कालावधी पूर्ण करतांना काही कटू तर काही चांगले निर्णय घेतले. निर्णय घेतले हे महत्वाचे निर्णय प्रक्रिया पूर्ण करून, पुढील पांच वर्षाच्या काळांत नागरिकांच्या आशा आकांक्षा ओळखून तसेच सरकारवर असलेल्या जाणीवेची जबाबदारी ओळखून निर्णय घ्यावे लागतील. 'पी हळद आणि हो गोरी' ही अतिशयोक्ती असलेली म्हण आहे व अशा म्हणींच्या आधारे नागरिकांनी अपेक्षा ठेवू नयेत. थोडा धीर धरणे अत्यंत आवश्यक आहे. कांही काळ या नवीन सरकारला देणे आवश्यक आहे, असो. नागरिकांच्या मतदानाचा आदर करून स्थापन झालेल्या या नवीन सरकारला हार्दिक शुभेच्छा.

एप्रिलच्या संपर्कचे अगदी मनापासून सभासदांनी स्वागत केले. झालेले बदल, नवीन विषयांची मांडणी, नवीन कल्पना यांचे अगदी भरभरून स्वागत केले. कौतुकाचे फोन, पत्रे आली आणि यामुळे संपादक मंडळाची आता जबाबदारी वाढली आहे. एप्रिल १४ च्या अंकाचे मुखपृष्ठ श्री. विवेक नारळकर यांनी खुद्द वाराणसीला जाऊन काढून आम्हाला अंकात वापरण्यासाठी दिले त्याबद्दल श्री. विवेक नारळकर यांचे मी हार्दिक आभार व्यक्त करतो.

बेळगांव येथे महासंघाची अर्धवार्षिक सभा पार पडली, त्याचे इतिवृत्त आपणांस अंकात वाचावयास मिळेलच. पण आज इथे जाहीर करतांना आनंद वाटतो तो हाच की, कर्नाटकातील ४-५ संघापैकी सिरशी(हॉसपेट)च्या संघाचे ३ प्रतिनिधी या सभेस उपस्थित होते आणि त्यांनीही संपर्कबाबत आस्था दाखविली. हाच धागा पकडून असे जाहीर करण्यांत आले की, कानडी भाषेमध्ये संस्था वृत्त, कविता, लेख जर मराठी भाषांतरासहित डीटीपी करून पाठविले, तर ते पुढील अंकात छापता येतील. एक नवीन विचार एक नवीन पाऊल. खरे तर पुण्याला जेव्हां संपर्कचा पहिला अंकाचा प्रकाशन समारंभ झाला, त्यावेळीच याची चर्चा झाली होती व ती आता फलद्रूप होत आहे. बेळगांव संघाने याची जबाबदारी स्वीकारली आहे, याबद्दल बेळगांव संघाचे हार्दिक अभिनंदन!

या पुढील महिने हे उत्सवाचे आहेत गणेशोत्सव, राखी पौर्णिमा, नवरात्री उत्सव मोठ्या आनंदाने साजरे होणार आहेत. सर्व ज्ञाती बांधवांना या सर्व उत्सवांसाठी हार्दिक शुभेच्छा.



# ‘बकुळफुले’

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**
रत्नागिरी

**धर्म हा शब्द रिलिजन अशा अर्थाने न घेता स्वीकृत कार्य अशा अर्थानं घ्यायला हवा. केवळ लहान मुलंच नव्हे तर सर्वसामान्य लोक सुद्धा अनुकरणप्रिय असतात. अशावेळी शिक्षक, समाजधुरीण यांच्या वर्तनावर इतरांचे अनुकरण अवलंबून असतं. मूल्यशिक्षणाची सुरुवात घरापासून होते. शाळेत ती विकसित होते आणि समाजात ती उपयोगात आणली जाते. कुटुंब, शाळा, समाज, राज्य आणि नंतर राष्ट्र इतक्या व्यापक स्वरुपात मूल्यवर्धन होत असतं. राष्ट्राच्या उभारणीत ते महत्त्वाचं योगदान देत असतं. त्याचं मूळ, कुटुंबात होणाऱ्या संस्कारांवर अवलंबून असतं.**

## मूल्य

मूल्याधिष्टित जीवनपद्धतीचा विचार आणि स्वीकार हा खरं तर आपल्या एकूणच समाजीवनासाठी महत्त्वाचा असणारा एक संस्कार आहे.

मानवी जीवनात मूल्यसंस्काराला खूप महत्व आहे. सत्य, सौंदर्य, मांगल्य, पावित्र्य, प्रेम, विश्वास, श्रद्धा, आदर अशी काही मूल्य ही शाश्वत स्वरुपाची मूल्यं आहेत. आपल्या भारतीय तत्वज्ञानानं त्याविषयी खूप विचार केला आहे. त्या दृष्टीनं भारतीय तत्त्वज्ञान हे जगात सर्वश्रेष्ठ आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी एके ठिकाणी विचार मांडले आहेत. ते म्हणतात, भारतीय तत्त्वज्ञान आणि मूल्याधिष्ठित जीवनपद्धती ही सगळ्या जगानं अंगीकारावी इतकी श्रेष्ठ आहे. मात्र जग त्याकडं कोणत्या दृष्टीनं पाहतं यावर त्यांची उपयुक्तता अवलंबून आहे. डॉ. राधाकृष्णन यांनी आयुष्यभर या सगळ्याचा विचार केला होता आणि त्यामुळंच तत्त्वज्ञानी राष्ट्रपती अशी त्यांची खास ओळख होती.

भारतीय तत्त्वज्ञान म्हणून मांडले गेलेले विचार नि:संशय श्रेष्ठ आहेत. पण समाजात ते किती उपयोगात आणले जातात हा ही विचार होणं गरजेचं आहे. गोष्टी लहानसहान असतात पण त्यातून मूल्यविचार किती रुजला आहे हे कळून येतं.

रस्त्यावरून जाताना डाव्या बाजुनं जावं हा नियम आहे आणि सर्वांची सुरक्षितता पाहणं हा मूल्यविचार आहे. पाळतो का की बेदरकारपणे केवळ आपलाच विचार करतो. कॅन्टीनमध्ये टेबलावर सांडलेलं पाणी स्वत:च्या रुमालानं टिपून ते जवळच्याच झाडाच्या कुंडीत पिळणारा विद्यार्थी हा मूल्यविवेक सांभाळणारा भावी नागरिक नक्कीच होऊ शकतो. आपल्या या कृत्याकडं बघून कोण हसत आहे, चेष्टा करत आहे याचा विचार तो करत नाही. स्वत:ला पटलेली गोष्ट ठामपणे करणारा विद्यार्थी, पुढच्या आयुष्यात नक्कीच यशस्वी होत असतो. यातील मूल्यविवेक पुन्हा महत्वाचा विवेक म्हणजे सारासार विचार करण्याची, खरं काय खोटं काय हे ओळखण्याची शक्ती, सौंदर्य हे बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतं, तर हे पाहणाऱ्याची दृष्टी कशी असेल त्यावर अवलंबून असतं असं म्हणतात. पण सौंदर्य म्हणजे काय हे मूल्यच जर माहीत नसेल, तर बाकी सर्व तत्त्वज्ञान फोल ठरू शकतं. जीवनातील मांगल्य, पावित्र्य, श्रद्धा, विश्वास, आदर या मूल्यांना उपयोजनाचं कोंदण लागतं. शिक्षकावरची श्रद्धा, माणसावरची श्रद्धा, लोकशाही जीवन पद्धतीवरची श्रद्धा या संबंधिताच्या वर्तनावर अवलंबून असतात. अशा विश्वासासाठी आपुलकी जिव्हाळा आणि एकमेकांवरची नितांत श्रद्धा आवश्यक असते. त्यातूनच आदरभाव जन्माला येतो.

अर्थात या शब्दांचा अर्थ लहान वयात, संस्काराच्या रुपाने विद्यार्थ्यांच्या मनात पेरला जाणं गरजेचं आहे. शालेय जीवनात परिपाठ, मूल्यशिक्षण यासाठी खास वेळ राखून ठेवलेला असतो. त्यावेळेत जे शिकवलं जातं ते संपूर्ण दिवसात आणि पुढच्या आयुष्यात उपयोगात आणलं गेलं तर तो वेळ सार्थकी लागेल अन्यथा ती पोपटपंची ठरेल. मुलं अनुकरणप्रिय असतात. मोठ्यांचं अनुकरण करणं त्यांना ठाऊक असतं. माऊली म्हणतात त्याप्रमाणं ... ...

**एथ वडील जे जे करिती। तया नाम धर्म ठेविती।**
**तेचि येर अनुसरती। सामान्य सकळ।।**

इथे धर्म हा शब्द रिलिजन अशा अर्थाने न घेता स्वीकृत कार्य अशा अर्थानं घ्यायला हवा. केवळ लहान मुलंच नव्हे तर सर्वसामान्य लोक सुद्धा अनुकरणप्रिय असतात. अशावेळी शिक्षक, समाजधुरीण यांच्या वर्तनावर इतरांचे अनुकरण अवलंबून असतं. मूल्यशिक्षणाची सुरुवात घरापासून होते. शाळेत ती विकसित होते आणि समाजात ती उपयोगात आणली जाते. कुटुंब, शाळा, समाज, राज्य आणि नंतर राष्ट्र इतक्या व्यापक स्वरुपात मूल्यवर्धन होत असतं. राष्ट्राच्या उभारणीत ते महत्त्वाचं योगदान देत असतं. त्याचं मूळ, कुटुंबात होणाऱ्या संस्कारांवर अवलंबून असतं. सध्याच्या वेगवान आयुष्यात इतर गोष्टींना वेळ कमी दिला तरी चालेल पण मूल्यसंस्कारासाठी अधिक वेळ द्यायला हवा. कारण त्यामुळे सशक्त, समृद्ध भावी नागरिक घडणार असतो.


प्रत्येकाने जेवणाप्रमाणे व्यायामालाही वेळ दिला पाहिजे.

# विज्ञान वार्ता

**डॉ.प्रमोद मोघे**
पुणे


मागील अंकात आपण सांडपाणी या प्रदूषण विषयावर चर्चा केली. त्याच क्रमांत पुढील कांही सांडपाणी निर्माण होण्याचे प्रकाराबद्दल चर्चा करणार आहोत.

आपणांस आता माहीतच आहे की, सांडपाणी म्हणजे सर्वसाधारणपणे व्यापार व घरगुती कृत्ये यामधून निर्माण झालेला कचरा. कृती क्र. ३ – स्नान करणे जवळपास एखाद्या महानगरामध्ये ३० लाख पुरुष–स्त्रीया रोज स्नान करतात. कांही जणांना तर सकाळ–संध्याकाळ असे दोन वेळा स्नान करण्याची सवय असते. स्नानासाठी फिनाईल युक्त साबणापासून ते चंदनाचा सुगंध असलेले साबण सर्वसाधारणपणे वापरले जातात. या साबणांत खाद्य तेले, सुगंधी रसायने, रंग, सल्फेट, कार्बोनेटस्, सोडियम, सुगंधी संयुगे आणि डिटर्जन्टस् वापरले जातात. अशा साबणांचा आपण रोज स्नानासाठी चार ते आठ ग्रॅम एवढा वापर करीत असतो. म्हणजेच जर ४ ग्रॅम × ३० लाख म्हणजेच १२० लाख ग्रॅम एवढी रसायने पाण्यात आपण विसर्जित करत असतो. ५ लाख स्त्रिया व पुरुष रोज केस धुण्यासाठी शांपूचा वापर करत असतात. य शांपूमध्ये सहा ते दहा ग्रॅम रसायानांचा समावेश असतो म्हणजेच ५ लाख नागरिक ५ ग्रॅम शांपू म्हणजे २५ लाख ग्रॅम रसायने पाण्यामध्ये विसर्जित करत असतो आणि रसायन युक्त सांडपाणी निर्मिती होत असते.

म्हणजे याचा अर्थ स्नानाच्यावेळी साबण शांपू यांचा वापरच करायचा नाही कां? तर त्याचे उत्तर म्हणजे अन्य साधनांचा वापर करे पर्यंत आपण या साबण शापूंचा वापर कमी प्रमाणात करून रसायन मिश्रीत सांडपाणी कमी करू शकतो. यावर उपाय आहेत आणि कृती पण आहे ती अशी :



१. पारंपारिक आणि बिनखर्चाचा उपाय म्हणून अंग स्वच्छ करण्यासाठी बाजारांत 'प्युमिक स्टोन' (ज्वालामुखीपासून निर्मित दगड) – हा दगड वडीच्या स्वरुपात मिळतो. शरीराला याच्या स्पर्शाने रंध्रे (शरीरातील छिद्रे) मोकळी होण्यास मदत होते.




२. रासायनिक साबणाऐवजी शिकेकाई, उटणे, रिठा ही घरगुती साधने वापरल्यास सुंगधीत स्नानाचा आनंद मिळून रासायनिक सांडपाणी कमी प्रमाणांत निर्मित होते.



३. लहान मुलांना शांपू साबण या मुळे ॲलर्जी येते, येऊ शकते यासाठी अत्यंत सोपा उपाय म्हणजे दुधावरील साय, डाळीचे मऊ पीठ दुधात मिसळून शरीरास लावल्यास प्रसन्न वाटते.

या साध्या उपायांमुळे आपण कितीतरी रासायनिक प्रदूषण की जे स्नानाद्वारे निर्मित होते ते टाळू शकतो आणि आपण प्रसन्न राहू शकतो.

कृती ४ कपडे धुणे –



स्नान झाल्यानंतर कपडे धुणे आलेच. धुण्याच्या साबणांत किंवा पावडरीमध्ये साधारणतः अखाद्य तेले, फॉस्फेट, कार्बोनेटस्, रंग, द्रव्ये, सुगंधी द्रव्ये यांचा वापर केला जातो. कपड्यावरील डाग काढण्यासाठी, ॲसिड, रसायने, लिक्वीडस् ही मिळतात. साधारणतः अशा साबण, ॲसिड, रसायनांचा सुगंधी द्रव्यांचा वापर कमीत कमी माणशी १० ग्रॅम धरल्यास ३५० लाख ग्रॅम रसायने सांडपाण्यात विसर्जित केली जातात.

म्हणजे कपडे धुण्यास डिटर्जन्टस्चा वापरच करायचा नाही कां? उत्तर हेच आहे की, वापर करावा पण तो जर १० ग्रॅम वापरत असाल तो ५ ग्रॅम वापरू शकता. पण आपले घरगुती साधनातूनही आपण रासायनिक प्रदूषणावर मात करू शकतो.

यासाठी रिठा, शेककाई किंवा व्हिनेगर चा वापर करून, नैसर्गिक साधनातून रासायनिक प्रदूषणावर मात करू शकतो.

कृती – ५ स्वयंपाकघर –

एखाद्या शहरांत जर ३० लाख नागरिक रहात असतील असे समजूया. या सर्व घरांमध्ये दररोज स्वयंपाक होत असतो. यामध्ये सकाळचा नाश्ता, चहा,कॉफी, जेवण इ. प्रकारापासून टॅनिन, कॅफिन, पॉली फिनाल्स रंगद्रव्ये, अखाद्य तेले, फॅती ॲसिडस्ट, मसाले, पदार्थातील रसायने, भाजी पाल्यावरील रसायने, किटक नाशके यांचा समावेश होतो. हे सर्व पदार्थ/वस्तू आपण धुवून घेतो त्यामुळे अंदाजे २० ग्रॅम रसायने स्वयंपाक घरामधून सांडपाण्यात मिसळली जातात. म्हणजेच एका शहरातून दररोज ३० लाख द २० ग्रॅम = ६०० लाख ग्रॅम एव्हढे प्रदूषण सांडपाण्याच्या रुपाने होते.



हे आपण थांबवू शकतो. कसे तर स्वयंपाक घरातील सांडपाणी जर आपण परसबागेत सोडले तर ते परसबागेत उपयोगी पडू शकते आणि परस बागेत पुन्हा झाडांना फुलझाडांना पाणी घालावे लागणार नाही. दुसरे म्हणजे हेच सांडपाणी पुर्नवापरासाठी प्रक्रिया करून वापरता येईल.

आपण जर या गोष्टींचा गांभिर्याने विचार केला तर एका शहरात एका दिवशी किती प्रमाणांत सांडपाणी तयार होते आणि केवढे प्रदूषण होते तसेच भारतभर असणाऱ्या अन्य शहरांमधूनही अशा प्रकारे एका दिवशी किती मोठ्या प्रमाणांत सांडपाण्याचा भस्मासूर वाढत आहे याची कल्पना येईल.

आपण या विषयावर गांभिर्याने विचार करालच आणि आपणांसही हे निदर्शनास येईल. जर अशा प्रकारच्या सांडपाण्यातील प्रदूषणाबद्दल माहिति असेल तर ती कळवावी. पुढील अंकामध्ये आपण भांडी घासणे, किटकनाशके फवारणे, संडास बाथरुम सफाईद्वारा होणाऱ्या सांडपाण्यातील प्रदूषणाची माहिती घेऊ.


व्यायामाने आरोग्य, अभ्यासाने ज्ञान तर उद्योगाने धन प्राप्त होते.

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

An Aesthetic Essence To Advertising

Domination in

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

## पत्रप्रतिसाद

### माधुरी शेंबेकर

पत्रप्रतिसाद — 'संपर्क' साठी —

स्वामी विवेकानंद सार्ध शती समारोह : १८६३-२०१३

भारत जागो! विश्व जगाओ!!

दैनंदिनी - २०१३ — संस्कारभारती कोकण प्रांत

दि० ११।६।२०१४

माधुरी श्रीकांत शेंबेकर
८२, १२०८, लोकमान्य रेल्वे
नगर। शंकरशेठ मार्ग। पुणे-
४११०४२

प्रगतिपथावरील 'संपर्क'!

स.न.वि.वि.

संपर्क त्रैमासिकाचा एप्रिल-जून-२०१४ चा अंक खूप देखणा-वाचनीय झाला आहे. 'विशाल वार्ता', व्यक्तिविशेष, वधुवरांची माहिती पाककृती, कविता-विनोद-चारोळ्या- ~~यांना सं~~ या नवीन सदरांमुळे-अधिक लोकांपर्यंत 'संपर्क' वाढतोय. प्रत्येक ~~पानावरील तळटीप~~ पानाच्या तळातील विचारधन ही आवडले 'समाजाचे हित ज्याने साधते ते साहित्य' या उक्तीप्रमाणे-सर्व लेख-अगदी संपादकीय पासून-शेवटच्या-'स्त्रीभ्रूणहत्या सामाजिक आव्हान' पर्यंत माहितीपूर्ण ~~आहेत~~ -साहित्य आहे. जाहिराती सुद्धा आकर्षक-लक्षवेधक आहेत.
माझी सूचना त्याच अंकात आणल्याबद्दल धन्यवाद! (वधुवरांची माहिती देणे)
'संपर्क' च्या भविष्यपूर्ण वाटचालीसाठी भरपूर शुभेच्छा!

— माधुरी शेंबेकर —
पुणे
९८६९०५४८५२

### श्री. र.बा.सप्रे

॥ श्री ॥

र. बा. सप्रे
८, मोनालिसा
अपार्टमेंट्स
कोथरूड पुणे ३८

मा. संपादक
संपर्क
नारायण पेठ,
पुणे. ३०

आपले 'संपर्क' त्रैमासिकाचा एप्रिल-जून १४ अंक मिळाला. अलिकडे मुखपृष्ठ रंगीत छापले जाते. त्यामुळे अंकाला एक प्रकारचे वेगळे रूप प्राप्त झाले आहे. वेगवेगळ्या शहरामधील कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्य वृत्त, प्रवासवर्णने, ज्ञातीतील मान्यवर तज्ञांची ओळख करणारा लेख, डॉ. दादासो शेंबेकर यांचा परिचय करून देणारा लेख, आणि इतर सदरे भरपूर मजकूर असलेला अंक पाहून आनंद वाटला. 'संपर्क' चा अंक असाच उत्तरोत्तम निघावा. संपादक मंडळाला धन्यवाद,

(सही)

### श्री. प्रभाकर कोनकर

२२।३।०१४ ॥ श्री ॥

श्री प्रभाकर वा. कोनकर
११ श्री निकेतन कृपा,
शिवमंदिर मार्ग रामनगर
डोंबिवली (पू) ४२१२०१

मा. संपादक यांस.

स.न.वि.वि.

आपण आपले कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे त्रैमासिक 'संपर्क' काढता ते अतिशय उत्तम आहे. ज्या वेळी ते काढले म्हणून अहोरात्र प्रयत्न करावे लागले होते. परंतु आता त्यामध्ये खूपच सुधारणा झालेल्या दिसत आहेत.

तसेच आपण दिलेली पोस्टाचे रजिस्ट्रेशन करून घेतले त्यामुळे पोस्टाचा खर्च कमी होईल.

### सौ. गौरी नानिवडेकर

॥ श्री ॥

कोल्हापूर
दि. १४ मे, २०१४

मा. संपादक, नियतकालीक 'संपर्क'

मी संपर्कचे नियमित वाचक असून संपर्कमध्ये नेहमी येणारी सदरे, संस्थावृत्त, दानशूर व्यक्ती ज्ञातीतील बांधव यांनी मिळवलेले अलौकिक यश इत्यादी माहिती आपल्या ज्ञाती बद्दल वाचताना खूप आनंद होतो. सामाजिक विषयावरही आवर्जून लेख असतो. त्यामुळे संपर्क आणखीनच वाचनीय होतो.

सभासद क्रमांक १५२८

(सही)
सौ. गौरी नानिवडेकर
कोल्हापूर



अनुभवाच्या अमृतातून न्हालेला शब्द म्हणजे साहित्य.

# व्यक्तिपरिचय
# महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार

विद्वानांचे मोजमाप त्याच्या लिहिण्याच्या उद्योगावर केले जाते. काळाच्या उदरात असले बरेच लिहिणे नाहीसे होते. त्या लिहिण्यावर फारसा विश्वास न ठेवता बहुश्रुततेची कास धरणारा आणि अनेक पढिक विद्वानांना धाक वाटणारा एक विलक्षण सहृदय ज्ञानोपासक म्हणजे **दत्तो वामन पोतदार**. भीमराव कुलकर्णी यांच्या 'देवाची माणसं' या पुस्तकातील त्यांच्यावरचा हा उतारा.. ....

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचे मूळ आडनाव ओरपे. यांचा जन्म १८९० मधला. कालांतराने ते कुलकर्णी झाले. कोकणात वीरवाडीचे कुलकर्णीपद त्यांच्या पूर्वजांपैकी कोणीतरी स्वीकारल्याने, ते कुलकर्णी झाले असावेत. परंतु नंतर व्यवसायपरत्वे पोतदार हे आडनाव त्यांना कायमचे चिकटले. एखाद्या कर्त्या पुरुषामुळे एखाद्या आडनावाला विलक्षण प्रतिष्ठा येते. पोतदार हे आडनाव दत्तोपंतामुळे चिरस्थायी झाले. त्यांचे वडील कुलाबा जिल्ह्यातील वीरवाडीतून वकिली करण्यासाठी पुण्यात आले. शालेय व उच्च शिक्षण पुण्यास झाल्यानंतर दत्तोपंत नूतन मराठीत शिक्षक झाले आणि इतिहासचार्य राजवाड्यांशी संबंध आल्यामुळे, ते संशोधन व सार्वजनिक कार्याकडे वळले. हयातभर या क्षेत्रात गाडून उभे राहिले आणि निरलसपणे कार्य करून दिगंत कीर्ती मिळवली.

आपल्या कुटुंबपद्धतीत घरातील ज्येष्ठ व्यक्तींना काही घरगुती, खाजगी संबोधदर्शक नाव देण्याची पद्धत आहे. सार्वजनिक जीवनात अशा काही व्यक्ती त्याच नावाने ज्ञात होतात. परंतु त्यांचे मोठेपण व्यक्त करण्यासाठी अशा नावापुढे 'साहेब', किंवा 'राव' अशा आणखी उपाधी जोडण्यात येतात. पोतदारांना घरी त्यांचे धाकटे बंधू दामुअण्णा 'दादा' म्हणत. कदाचित त्यामुळे खाजगीत पोतदार त्यांच्या निकटवर्तीयांचे 'दादा' झाले असावेत. परंतु पोतदारांनी कधी त्याचे 'दादासाहेब' होऊ दिले नाही. एक–दोनदा सहज बोलण्याच्या ओघात मी त्यांना 'दादासाहेब' म्हटले, तेव्हां त्यांनी लगेच दटावले, 'नाही' आपले नेहमीचे दादा म्हणा'.. .. आणि ते आपले नेहमीप्रमाणेच प्रसन्न हसले. 'दादा' या उपाधीमध्ये जी जवळीक आहे, जो अकृत्रिम जिव्हाळा आहे, त्या जिव्हाळ्यानेच त्यांनी माणसे



जवळ केली, त्यांच्यावर प्रेम केले, इतकेच नव्हे, तर हा लहान, हा मोठा अशा भेदभाव न करता त्यांच्यावर त्यांनी सातत्याने मायेची सावली धरली. हे त्यांचे मायेचे छत्र किती जणांना लाभले याचा विचार करू लागल्यानंतर आपले मन आश्चर्यचकित होते. पोतदारांच्या स्वभावामध्ये माणसे जवळ घेण्याचा आगळा गुण होता. त्यामुळे ते कुठेही गेले तरी नैमित्तिक कारणांमुळे त्यांच्या सान्निध्यात आलेली माणसे एकदम त्यांची होत. पोतदार, त्यांची त्यांच्या घराण्याची, त्यांच्या आप्तेष्टांची माहिती आस्थेने, जिव्हाळ्याने या सर्व गोष्टी आठवून आपण त्या विसरलो नाही याचे स्मरण देत. त्यांच्या त्या विलक्षण स्मरणशक्तीनेच अगोदर माणसे चकित होत. परंतु ही त्यांची स्मरणशक्ती आस्थेतून, जिव्हाळ्यातून समृद्ध आणि संपन्न झाली होती आणि त्यामुळेच त्या स्मरणशक्तीला एक आगळे मूल्य होते. अशा आस्थेमुळे, जिव्हाळ्यामुळे केवळ साऱ्या महाराष्ट्रातच नव्हे, तर साऱ्या भारतात पोतदारांचे नाव निघाले की, त्यांच्या सान्निध्याच्या सुखद स्मृती आठवणाऱ्या असंख्य व्यक्ती पहायला मिळतात.

**पढिक विद्वानांना धाक वाटणारा एक विलक्षण सहृदय ज्ञानोपासक**

मी १९६० मध्ये पुण्याला घर केले. त्यावेळी मी माझ्या आईला बरोबर आणले होते. पोतदारांचा काही दिवसांपूर्वीच परिचय झाला होता. मी त्यांना एकदा घरी जेवायला बोलवायचे ठरवले. त्यांनी मोठ्या आनंदाने यायचे कबूल केले. मी त्यांना त्यांच्या 'लोककल्याण' मध्ये दुपारी बारा वाजता बोलवायला गेलो. त्यांनी एकदीड वाजेपर्यंत गप्पांमध्ये मला गुंगवून ठेवले. मी अस्वस्थ होऊन चुळबूळ करीत होतो, पण त्यांना कसलीच घाई नव्हती. उठून तयार व्हायला त्यांनी दहापंधरा मिनीटे घेतली. दोन वाजता घरी आम्ही जेवायला बसलो. सावकाश, गप्पा मारीत परंतु मोठ्या चवीने त्यांनी जेवण केले. त्या भोजनातल्या पुरणपोळीच्या निमित्ताने त्यानंतर मी भेटल्यावर ते कित्येक दिवस माझ्या आईची आस्थेने चौकशी करीत. माझ्या आईच्या मृत्यूनंतर त्यांची भेट झाली असता, माझे सांत्वन करताना एक क्षणभरच त्यांच्या आवाजात कातरता आली. अशा जिव्हाळ्याने पोतदार माणूस आत्मसात करीत आणि तो त्यांच्या कायम प्रेमांत पडे. त्यानंतर पोतदारांच्याकडे जाऊन आम्ही ज्या ज्या वेळी गप्पागोष्टी केल्या, तेव्हां आपल्या घरातल्या सगळ्यात वडीलधाऱ्या व्यक्तिला भेटल्याचा आनंद मी अनुभवला. अर्थातच अशा वडीलधाऱ्या माणसांचा मला अभावानेच अनुभव होता आणि आमच्या जुन्या काळच्या वडीलधाऱ्या माणसांशी मी पोतदारांइतक्याच दिलखुलासपणे बोलू शकलो असतो की नाही, याची मला शंकाच आहे. कारण अंत:करणातला प्रेमळपणा व्यक्त करण्याच्या जुन्या माणसांच्या पद्धती काही वेगळ्याच होत्या. पोतदारांचा प्रेमळपणा मात्र दिलखुलास होता, झपाटून टाकणारा होता.

या प्रेमळपणामागे मनाची आत्यंतिक निर्मळता होती. 'शुचिता', 'पावित्र्य' या शब्दांनी आपण जे काही व्यक्त करू पाहातो, ते सारे काही त्यांच्या अशा प्रकारच्या निर्मख प्रेमळपणात असल्याने पोतदारांचे सान्निध्य नेहमीच उदात्त आणि पवित्र भावनांचा प्रत्यय आणून देत असे. आचार्य अत्र्यांसारख्या बहुरंगी माणसालाही याच गुणाने पोतदार झपाटून टाकीत. अत्र्यांनी पोतदारांना झपाटून टाकीत.

पहा पान ११ वर....


कर्तृत्वाला कल्पकतेची जोड मिळाली तर अद्भुत कार्ये घडतात.

# व्यक्तिपरिचय मालतीबाई पेंढारकर

मराठी नाट्यप्रेमींना मालतीबाई पेंढारकर हे नाव परिचित आहेच. पूर्वाश्रमीच्या मालती नाफडे यांचा विवाह १९४८ साली 'ललितकलादर्श'चे भालचंद्र पेंढारकर यांच्याशी झाला. संसार आणि रंगभूमी असे दुहेरी व्रत घेतलेल्या मालतीबाईंनी हे व्रत आयुष्यभर प्राणपणाने सांभाळले. व्यावसायिक भूमिका निभावतानाच त्यांनी सांसारिक भूमिकाही तितक्याच ताकदीने किंबहुना काकणभर अधिक प्रभावीपणे निभावल्या. मालतीबाईंची कारकीर्द लग्नापूर्वी, म्हणजे १९४३-४४च्या सुमारास पृथ्वी थिएटरमधून सुरू झाली होती. त्यानंतर 'सत्तेचे गुलाम' नाटकाच्यावेळी त्या ललितकलादर्शमध्ये आल्या. नाटकात पदार्पण करण्याबरोबरच त्यांनी भालचंद्र पेंढारकर, अर्थात अण्णांच्या आयुष्यातही पदार्पण केले आणि अण्णांबरोबरच ललितकलादर्श या संस्थेशीही त्यांची कायमची गाठ बांधली गेली. ललितकलादर्शला त्या आपले दुसरे कुटुंबच मानायच्या. आईच्या मायेने त्यांनी संस्थेचे पालनपोषण केले. आज संस्था शंभर ओलांडू शकली, यात मालतीबाईंचा



वाटा फार मोठा आहे. ललितकलादर्शच्या कुटुंबात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिसाठी मालतीबाई म्हणजे एक मोठा आधारस्तंभ होत्या. सांसारिक जबाबदाऱ्या निभावत असतानाच दुसरीकडे त्यांचे कलाजीवनही विविध भूमिकांमधून बहरत होते. ललितकलादर्शच्या जवळपास सगळ्याच, नाटकांत त्यांनी भूमिका केल्या. 'स्वामिनी'तील काशी, 'दुरितांचे तिमिर जावो' मधील डॉ. ललिता, 'संन्याशाचा संसार' मधील किशोरी या त्यांच्या गाजलेल्या भूमिका, याव्यतिरिक्त इतर नाट्यसंस्थांसाठीही त्यांनी भूमिका केल्या. साहित्य संघाशी मालतीबाई आणि अण्णांचा घरोबा होता. साहित्य संघातर्फे केलेली 'सौभद्र', संशयकल्लोळ', 'होनाजी बाळा', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', ही त्यांची नाटके गाजली. नाट्यसंपदेच्या 'अश्रूंची झाली फुले' मध्येही त्यांनी काम केले होते. 'अभिजात' संस्थेच्या 'गुंतता हृदय हे' मधील मामी ही त्यांची अत्यंत गाजलेली भूमिका. त्या नाटकापासून मालुताई सगळ्यांच्या मामी झाल्या. अभिनयाबरोबरच पार्वती कुमार यांच्याकडे त्या नृत्य शिकलेल्या होत्या. पृथ्वी थिएटरमध्ये यायच्या आधी 'तुफानी स्वार' आणि 'कारस्थान' या दोन हिंदी चित्रपटांमधून त्यांनी भूमिका केल्या होत्या. अत्यंत लाघवी स्वभावाच्या आणि कायम सकारात्मक दृष्टिकोन असणाऱ्या मालतीबाईंनी आपला संसारही तितक्याच प्रभावीपणे केला. प्रसंगी आपले कलाजीवन मागे सारून, त्यांनी सांसारिक जबाबदाऱ्यांना प्राधान्य दिले. उत्तम सून, कर्तबगार पत्नी, प्रेमळ आणि शिस्तप्रिय आई, मैत्रीचा धागा जोडणारी सासू अशा अनेक भूमिका त्यांनी प्रत्यक्ष आयुष्यात समर्थपणे निभावल्या. त्यातील आईची भूमिका मुलांचं आयुष्य उजळून टाकणारी ठरली. अत्यंत सकारात्मक विचारशैली जोपासणाऱ्या मालतीबाईंचे व्यक्तिमत्व दुसऱ्याला सकारात्मक ऊर्जा देणारे असेच होते.

---

# बोधकथा

## धैर्याची परिसीमा

भालचंद्र भाटवडेकर हे मुंबईतले एकेकाळचे नामांकित डॉक्टर आणि सार्वजनिक क्षेत्रातलं बाणेदार व्यक्तिमत्व. भाटवडेकर अनेक सामाजिक संस्थांशी निगडित होते. त्यांच्या धैर्याबद्दलची ही आठवण.

गिरगावात त्या वेळी बॉम्बे बँकिंग कंपनी नावाची बँक होती. बँकेच्या संचालक मंडळावर भाटवडेकर होते. या बँकेचं १९१२-१३ च्या सुमाराला अचानक दिवाळं निघालं. बँकेला टाळं लागलेलं पाहून लोक संतापले. बँकेच्या प्रवेशद्वाराशी जमाव गोळा झाला. पोलिस बंदोबस्तात सरकारी लिक्विडेटर आणि काही कारकून काम करत होते. मात्र लोकांच्या संतापाचा उद्रेक व्हायची वेळ आली होती. भाटवडेकरांना हे समजल्यावर ते बँकेत जायला निघाले. जमावाच्या रागाची कल्पना असल्यामुळे काही हितचिंतकांनी त्यांना तिकडे न जाण्याचा सल्ला दिला, मात्र त्याला न जुमानता भाटवडेकर बँकेपाशी आले. पोलिसांनी त्यांच्याभोवती कडे करून त्यांना सुरक्षित आत नेले. मात्र पाचव्या मिनीटाला भाटवडेकर बाहेर आले. लोकांनी त्यांच्यावर आरोपांचा भडिमार केला. यावर भाटवडेकरांनी शांतपणे हात जोडले आणि लोकांना उद्देशून म्हणाले, 'संचालक म्हणून मी झाल्या प्रकाराची जबाबदारी घेतो आहे. चारित्र्यापुढे मला संपत्तीची आणि प्राणांचीही पर्वा नाही. मी माझं पासबुक आणि कोऱ्या धनादेशांचं पुस्तक संबंधितांकडे देतो आहे त्यांनी माझ्याकडून गरज असेल तेवढी रक्कम घ्यावी. हवं तर मी माझी इस्टेटही द्यायला तयार आहे. तुम्ही सगळ्यांनी मला क्षमा करावी एवढीच माझी विनंती आहे.' भाटवडेकरांचं हे बोलणं ऐकून लोक अवाक झाले. चारित्र्यसंपन्न माणसाचं धैर्य पाहून ते शांत झाले. त्यांना पैसे परत मिळाले नाहीत हे खरं, मात्र भाटवडेकरांविषयीचा त्यांचा आदर कित्येक पटींनी वाढला. असं व्यक्तिमत्व ज्यांनी प्रत्यक्ष पाहिलं, अनुभवलं ते भाग्यवानच!

**– वर्षा गजेंद्रगडकर**

**आजच्या काळांतील परिस्थिती आणि सुमारे १०० वर्षापूर्वीची परिस्थिती यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. आता बँका पतसंस्था लुटणारे जास्त आणि त्याबद्दल खंतही नाही अशी अवस्था आहे. या पार्श्वभूमीवर श्री भालचंद्र भाटवडेकर हे हिमालयाच्या उंचीएवढे आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.**


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीा सर्व सोयींनी केटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# झाशीवाली



कोण ही चालली
ठेचीत टाचेने
घोडा हा चौखूर
लंघील क्षितिज
धडाडे धरणी
समर चंडिका
मर्दानी पोशाख
पोलादी मुठीत
बांधिला पाठीशी
अभेद्य पर्वती
वंशाचा वारस
मातेच्या मायेला
त्याही दत्तकाला
सकाले नागिण
पोटीचे वात्सल्य
चालली रणांत
वदनी विरश्री
अभागी मातेचे
वात्सल्य वीरश्री
ओतूनी कोरली
नावाने ही लक्ष्मी
समसे कालिका

बेफाम दौडत
फिरंगी दौलत?
उड्डाणी झेपेत
एकाच टापेत
कडाडे बिजली
रणांत ठाकली
फेटा डौलदर
तळपे तलवार
दत्तक कुमार
मायेचा पाझर
राज्याचा मालक
दत्तक बालक
मिळता नकार
टाकीत फुत्कार
बांधून पाठीला
मृत्यूच्या भेटीला
राजस लावण्या
वात्सल्य कारुण्य
एकाच मुशीत
मूर्ती ही खचित
रुपे सरस्वती
एकच भारती

**झाशीच्या राणीच्या पवित्र स्मृतिदिना निमित्त सादर**

**कवि – केदार**

**कै. गंगाधरे वि. ठेकेदार (तांबे)**

**द्वारा श्री. किशोर ठेकेदार, वारजे पुणे**

पहा पान ८ वरुन.....

**पढिक विद्वानांना धाक वाटणारा एक विलक्षण सहृदय ज्ञानोपासक**

अत्र्यांनी पोतदारांना उद्देशून 'महाराष्ट्राचा पुण्यपुरुष' असे म्हटले आहे, ते उगीच नव्हे. पोतदार मोठे इतिहाससंशोधक असले तरी भूतकाळात रमणारे नव्हते. त्यांनी भूतकाळाचा साक्षेपाने शोध घेतला तो त्या काळातील कर्तबगार माणसांच्या हालचालींचे वास्तव स्वरुपात दर्शन घेण्यासाठी, त्या भूतकाळातील कर्तबगार माणसांप्रमाणेच त्यांना वर्तमानकालातील माणसांचेही प्रेम होते. त्यामुळे ते आधुनिकातले आधुनिक होते. अत्याधुनिक होते. त्यांची ती प्रसिद्ध पुणेरी पगडी, त्यांचे ते उपरणे आणि काही वेळा ते गमतीने पुणेरी जोडही वापरत. परंतु ते जुन्या मतांचे, जुन्या प्रवृत्तीचे होते, असे मुळीच नव्हे. त्यांच्या त्या सार्वजनिक वेषांमुळे ते दिसत निराळे. परंतु ते असत मात्र आमच्यातलेच. जनसामान्यात मिळून, मिसळून, हसत, हसवीत आणि हसवता, हसवता 'हम भी कुछ भी कम नहीं' असा सुखद आश्चर्याचा गोड धक्का देत.

ज्ञानोपासना हव्यासापोटी आणि असंख्य सार्वजनिक संस्थांचा हसतखेळत रात्रंदिवस व्याप सांभाळण्यासाठी पोतदार आजन्म ब्रह्मचारी राहिले. परंतु हे ब्रह्मचर्य पेलण्याची एक विलक्षण ताकद त्यांना या जिज्ञासापोटी प्राप्त झाली होती. पोतदार अनेक स्त्रियांच्या, सुंदर तरुणींच्या घोळक्यात गप्पागोष्टी, थट्टामस्करी करीत. सहजगत्या वावरत. एखाद्या सुंदर युवतीसमोर त्यांची पापणी खाली पडली असे झाले नाही. पोतदार 'ज्ञानी' होते. परंतु केवळ पुस्तकी पंडित नव्हते. ज्ञानसाधना म्हणजे, केवळ एखाद्या विषयाचा अभ्यासाने केले पाठपुरावा असा या शब्दाला एक संकुचित अर्थ प्राप्त झाला आहे. पोतदार

या अर्थाने पढिक ज्ञानसाधक नव्हते तर मनुष्यस्वभावाचा, मानवी सुखदु:खांच्या जाणीवेने ज्ञानाची उपासना करणाऱ्या अलौकिक अशा स्थितप्रज्ञ पुरुषांच्या कोटीतले होते. त्यांना विद्या, कला, भाषा आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांची विलक्षण आस्था होती. त्यामुळे सर्व थरातल्या, सर्व प्रकारच्या काही ना काही महत्वाचे कार्य करणाऱ्या माणसांचे कौतुक करण्याची नव्हे, त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम करण्याची, त्यांच्या मनाची अत्यंत व्यापक धारणा होती. साहित्य परिषदेचा सेवक मारुती पवार हा महत्वाचा घटक आहे, या जाणिवेने ते जसे त्यांच्यावर प्रेम करीत, तसेच निधड्या छातीचा आणि बेदरकार जीवन जगण्याचे सामर्थ्य असलेला लढाऊ साहित्यिक म्हणून त्यांना आचार्य अत्रे महत्वाचे वाटत.

पोतदारांच्या ज्ञानसाधनेला क्षणाचाही विराम नव्हता. कारण कोणत्याही गोष्टीला 'फुरसत नाही' अशी त्यांच्याजवळ सबब नव्हती. लोकांशी बोलावे, लोकांत जावे, मिसळावे, ताजेतवाने व्हावे आणि आपल्या मठीत येऊन समोर पडलेल्या कामांच्या राशीतून दिवसभराचा राहिलेला वेळ, त्यातल्या काही गोष्टींच्या अवलोकनात घालवावा, हा त्यांचा दैनंदिन कार्यक्रम होता. त्यामुळे सभासंमेलने, चर्चा, परिसंवाद ही त्यांच्या श्रमसाधनेची प्रमुख केंद्रे आणि त्यांच्या उत्साहाची प्रेरणास्थाने होती. ते साहित्यसंमेलनांना न चुकता हजर रहात. संमेलनांच्या सर्व कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहत. अध्यक्ष व्हायला सांगा होत. बोलायला सांगा, बोलत. ठराव मांडायला सांगा–मांडत, भांडत, तंडत आणि काहीच नसले तर भक्ताच्या भूमिकेत नुसते बसून राहत. १९१२ पासून पंढरपूर, कराड आणि चंद्रपूर अशी तीन संमेलने सोडली तर बाकीच्या साऱ्या संमेलनांना हजर राहणारे तेच एकटे होते! वर्तमानपत्रे तर आस्थेने ते रोजच्या रोज वाचता. पण त्यातल्या महत्वाच्या बातम्यांची टाचणे करून ठेवत. अर्थात इतिहाससंशोधनविषयक कागदपत्रांचे, त्यांच्याकडे आलेल्या ग्रंथांचे आणि नियतकालिकांतील लेखांचे त्यांचे सूक्ष्म परिशीलन सतत चालूच असे. ज्ञानसाधनेला काहीही वर्ज्य नाही, कुठलेही पथ्य नाही. फक्त साक्षेप, सत्यनिष्ठा आणि व्यापक सहानुभूती हवी अशी त्यांची धारणा होती आणि तशी त्यांची कृती होती.

त्यामुळे आपल्याकडे आलेल्या कोणत्याही वस्तूला रद्दी म्हणून, अडगळ म्हणून त्यांनी निकालात काढले नाही. गेल्या पन्नास पाउणशे वर्षातील त्यांच्याकडे गेलेल्या सर्व लग्नपत्रिका सर्व प्रकारची नाटकांची, सिनेमांची हँडबिले, वेळोवेळी निघालेली पत्रके यांचा त्यांनी कसोशीने संग्रह केला होता. पोतदारांनी माणसे जोडली ती जिव्हाळ्यापोटी आणि संस्था उभ्या केल्या, जोपासल्या त्या राष्ट्रीय दृष्टीकोनातून, भांडखोर अशा महाराष्ट्रातल्या कित्येक सार्वजनिक संस्था उभ्या राहिल्या, वाढल्या त्या दत्तोपंतांसारखे लोकशाही वृत्तीचे आधारस्तंभ त्यांना लाभले म्हणून. अनेक सार्वजनिक संस्थांचे संसार त्यांनी उभे केले, ते त्यांनी स्वत:चा संसार उभा केला नाही म्हणून, हे लक्षात घ्यायला हवे. महामोह दत्तो वामन पोतदार हे कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणेचे संस्थापक अध्यक्ष होते आणि त्यांनी घालून दिलेल्या संस्कारातूनच पुण्याच्या संघाची वाटचाल सुरू आहे.

'सरते शतक' लोकसत्ता ८ जुलै २००० दैनिकामधून साभार



नम्रता म्हणजे अहंकाराचा नाश.

# पाककृती

## पालक सूप

साहित्य – एक गड्डी हिरवा कोवळा पालक, पांच पाकळ्या लसूण, एक कांदा बारीक चिरलेला, एक कप दूध, मीठ, मीरपूड स्वादानुसार, सहा ते सात कप पाणी.

कृती – प्रथम पाणी उकळून घ्यावे. त्यामध्ये हिरवा कोवळा चिरलेला पालक, कांदा, लसूण घालून एक मिनिट उकळून घ्यावे. थंड झाल्यावर दूध घालून मिक्सर मधून फिरवून घ्यावे. आपल्या आवडीनुसार मीठ, मीरपूड घालून गरम सर्व्ह करावे.





## लाल भोपळ्याचे सूप

साहित्य – लाल भोपळ्याच्या साल काढलेल्या दोन वाट्या फोडी, एक कांदा बारीक चिरलेला, अर्धा कप दूध, एक टीस्पून तूप, मिरेपूड, दालचिनी पूड, मीठ स्वादानुसार, सहा ते सात कप पाणी

कृती – पातेल्यांत तूप घालून बारीक चिरलेला कांदा लालसर परतून घ्यावा. त्यामध्ये लाल भोपळ्याच्या फोडी घालून मऊ होईपर्यंत शिजवाव्यात. हे सर्व शिजलेले मिश्रण मिक्सरमधून फिरवून काढावे. त्यामध्ये अर्धा कप दूध घालावे आणि पुन्हा हे मिश्रण मिक्सरमधून फिरवून घेऊन त्यामध्ये सहा ते सात कप पाणी मिसळून उकळावे. त्यामध्ये मिरपूड, दालचिनी पूड आणि मीठ स्वादानुसार घालून ते गरम सर्व्ह करावे.



## मिश्र भाज्यांचे सूप

साहित्य – दुधी भोपळा, घेवडा, टोमॅटो, गाजर, कोबी, या सर्व भाज्यांच्या फोडी प्रत्येकी अर्धावाटी, दोन टेबल स्पून, मसूर डाळ, एक टी स्पून मैदा, सहा कप पाणी, लिंबाचा रस, मिरेपूड, मीठ, साखर, स्वादानुसार.

कृती – सर्व भाज्या आणि मसूरडाळ उकडून घ्याव्यात. थंड झाल्यावर मिक्सरमधून, बारीक करून घ्यायाव्यात. एक वाटी पाण्यांत चमचाभर मैदा घालून त्याची पेस्ट करावी. मिक्सरमधून काढलेल्या भाज्यांच्या मिश्रणांत, डाळीचे वाटण, पाणी आणि मैदा घालून मिश्रण उकळवावे. त्यामध्ये चवीनुसार, मीठ, जीरेपूड, साखर घालावी. सर्व्ह करतांना लिंबाचा रस घालावा.

**डॉ. सौ. अनुराधा पटवर्धन, पुणे**
**आहारतज्ञ**

## आपल्या देशासाठी आपण काय करू शकतो?
## घरात व ऑफिसमध्ये खालील गोष्टींचा अपव्यय टाळा.

- वीज, पाणी व अन्य
- इंधन (पेट्रोल)

**वाहतुकीचे नियम पाळा**

- लाल दिव्याचा आदर करा. चुकीच्या दिशेने गाडी चालवू नका.
- पादचारी, लहान मुले व वृद्ध यांना प्राधान्य द्या. गाडीच्या हॉर्नचा **अनावश्यक वापर करू नका.**
- शक्य असेल तिथे चालत किंवा सायकलने जा. चालताना पदपथ अथवा भुयारी मार्गाचा वापर करा.

**सार्वजनिक ठिकाणी**

- स्वच्छता राखा, रस्त्यावर थुंकू नका.
- इतरांना त्रास होईल अशी कुठलीही गोष्ट करू नका.
- आपल्या परिसराचे भान राखा, तो स्वच्छ ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करा.

**समाज व देशाप्रती आपले कर्तव्य व जबाबदारी**

- स्वत: ओळखा व मुलांना त्याची जाणीव करून द्या.
- प्राप्तीकर व विवरण पत्र वेळच्या वेळी व प्रामाणिकपणे भरा.
- लाच देऊ नका व घेऊ नका.
- भ्रष्टाचार करू नका अथवा त्यात सामील होऊ नका.
- ग्राहक हक्कांविषयी जागरुक रहा व इतरांना जागृत करा.
- किमान एक झाड लावा व त्याची निगा राखा.
- किमान एका व्यक्तिस साक्षर करा.
- सामाजिक कामात तन, मन आणि धनपूर्वक सहभागी व्हा.
- कॅरी बॅग व प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर शक्यतो करू नका.
- ऐतिहासिक वास्तूंचे पावित्र्य राखा.
- राष्ट्रगीताचा मान राखा. कागदी वा प्लॅस्टिक राष्ट्रध्वज पायदळी तुडवू नका.
- १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला झेंडावंदन आवर्जून करा.
- घरात मातृभाषेचा वापर करा.
- मतदान आपले कर्तव्य आहे; ते जरूर करा.
- वेळेचे महत्व ओळखा व दिलेली वेळ पाळा.
- स्वधर्माचे आकलन करा; अस्पृश्यता पाळू नका.
- लहान मुलांना राष्ट्रपुरुषांविषयी माहिती द्या, त्यांना चांगली पुस्तके वाचायला द्या.
- वैयक्तिक व्यावसायिक व सामाजिक जीवनात निष्ठेने व सचोटीने वागा.
- निर्व्यसनी रहा व इतरांना रहाण्यास प्रेरणा द्या. (मद्य, तंबाखू इ. व्यक्ती, कुटुंब व समाज सर्वांनाच पोखरतात)


गुण प्राप्त करणे सोपे आहे पण दोष दूर करणे कठीण आहे.

# कऱ्हाडे ब्राह्मण नमो नम:

कऱ्हाडे कऱ्हाडे भात भराडे
असं कोणीतरी म्हटलेलं ऐकलं
आणि कुठेतरी आत मन खंतावलं
अरे आम्ही नुसते भात भरडतो काय?
आमचे पराक्रम तुम्ही ऐकले नाहीत काय?
झाशीची राणी लक्ष्मीबाई किती वीरश्रीने लढली होती.
देशासाठी तिची आहुती पडली होती.
आमच्या ज्ञातिबांधवांनी कित्येक क्षेत्रात केली आहे. प्रगती
सदैव आणि सर्वत्रच काम करत असते. आमची तल्लख मती
परदेशातही परजतात आमची मुले बुद्धीची तलवार!
आमचे ज्ञातिबांधव. तसे सगळ्याच बाबतीत तालेवार!
साऱ्या ज्ञातिबांधवांना माझा सादर नमस्कार.
साऱ्यांना माझा मानाचा पुरस्कार!
ॐ ज्ञातिबांधवेभ्यो नम:। कऱ्हाडे ब्राह्मण संघेभ्य: नम:।
कऱ्हाडे ब्राह्मण बुद्धिमद्भ्य: नमो नम:।
ॐ ब्राह्मणाय शान्तिरस्तु। तुष्टिरस्तु।
पुष्टिरस्तु तुष्टि: अस्तु किन्तु पुष्ट्यर्थ दानशूरेभ्य: नमो नम:।
तुष्टिरस्तु, पुष्टिरस्तु, वृद्धिरस्तु।
ॐ कऱ्हाडे ब्राह्मणेभ्यो शान्तिरस्तु।
ॐ शान्ति: शान्ति: शान्ति:।

**– सौ. वैशाली हळबे, रत्नागिरी**
**९४२३०४७२५५**


**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**



कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

# वसुधा एंटरप्रायजेस

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

**वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...**
**... सर्व सेवा एकाच छताखाली**


# ''चूक''

लोखंडाची 'चूक' सांधते करते एक पट्टी ।
मानव कर्तृत्वाची 'चूक' बिघडवते गट्टी ।।१।।
'चूक' सोन्याची मिळणी करीते पाटलीच्या तोंडा ।
'चूक' शब्दांची गुन्हा करूनी फोडीते तोंडा ।।२।।
नाथांनी शोधिली प्रयत्ने एक पै ची चूक ।
शब्द्चूक परि नित्य भागवी द्वेषाची भूक ।।३।।
'चूक' एकची लहान अथवा महान जरी झाली ।
एका क्षणातच प्रयत्ना डावलून घाली ।।४।।
अशी एकच जरी जाहली, विस्मरणाची 'चूक' ।
होवो प्रभुकृपा प्रसादे जीवन 'बिनचूक' ।।५।।

**संकलक– श्रीमती उषा कशेळकर**
**– डोंबिवली**

## काव्यसुमने

### विसर भोळेपणा

जनता फक्त भोळीच नाही
ती तर विसर भोळीच आहे
ती विसरून जाते
सभोवती लांडग्यांची टोळी आहे
जनता भुरळते, हुरळते,
पुन्हा लांडग्यांच्याच नादी लागते
बळीच्या बकऱ्यांची मग
पुन्हा पुन्हा नवी यादी लागते

---------------------

वाळूत मारीत होतो रेघा
नांव तुझं लिहीलं गेलं
नजर लागली पाण्याची
अखेर पुसून गेलं

-----------------------

### राजकीय आगडोंब

राजकारणी देतात पेटवून
मग गांव धगधगत राहतात
पेटलेल्या ज्वालांची मजा
मनसोक्तपणे बघत राहतात
आपण पेटवले गेलोय
हे गावांनाही कळलेले असते
तोपर्यंत गावांचे गांवपण
मुळासकट जळालेले असते.

----------------------

### उमेदवाराची गरिबी

कुणाला घर नाही, कुणाला गाडी नाही
एवढेही न समजायला जनता काही अनाडी नाही
कुणी भूमी हीन,तर कुणी अल्प भू धारक आहेत
संपत्तीच्या जाहीर लपवा छपवीचे
प्रकारच सारे आश्चर्यकारक आहेत.

----------------------

## वाटणी

वाटणी घासाची होते
इस्टेटीची होते
जमिनीची होते
कोर्ट कचेऱ्या करूनही
सगळ्या इथेच रहाणाऱ्या
गोष्टींची वाटणी होते
पण वाटणी
होणाऱ्या त्रासाची नसते
श्वासाची नसते
तिथे मालक एकच अन्
मालकीही एकाचीच
वेदना सहन करायची
इथे मात्र वाटणी नसते.

### विवाह म्हणजे काय?

**हे एक असे नाते असते की एकाची भूमिका नेहमी योग्य असते व दुसरी भूमिका पार पाडणारा नेहमी पती असतो. विवाह केल्यावर पतीची बॅचलर डिग्री हिसकावून घेतली जाते तर पत्नीला आपोआपच मास्टर्स डिग्री मिळते.**



### वाईट वेळ

कोणावरही वाईट वेळ आली की त्याचे संपूर्ण कुटुंब, नातलग, मित्र सर्वचजण त्याच्या मागे उभे राहतात.
विश्वास नाही बसत??
कोणच्याही लग्नाच्या फोटोंचा अल्बम उघडून पहा....


सातारी पेढा शॉप



संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
पौष्टीक खाद्य भांडार
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

## With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI
SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**


PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390
Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664
E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.




DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10

Fabricated Parts
Manifold Exhaust, Silencers, Pipe bends, Air Cleaner Assembly etc..



**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450










**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.

# महत्व दिवसांचे

| | | |
|---|---|---|
| १) | राष्ट्रीय डॉक्टर दिन | – १ जुलै |
| २) | ॲलर्जी प्रतिबंधक दिन | – ८ जुलै |
| ३) | मातृसुरक्षा दिन | – १० जुलै |
| ४) | जागतिक लोकसंख्या दिन | – ११ जुलै |
| ५) | वनसंवर्धन दिन | – २३ जुलै |
| ६) | वनमहोत्सव दिन | – १ ऑगस्ट |
| ७) | जागतिक मैत्री दिन | – ३ ऑगस्ट |
| ८) | क्रांती दिन | – ९ ऑगस्ट |
| ९) | संस्कृत दिन | – १० ऑगस्ट |
| १०) | स्वातंत्र्यदिन | – १५ ऑगस्ट |
| ११) | लोकशक्ती दिन | – २० ऑगस्ट |
| १२) | सद्भावना दिन | – २० ऑगस्ट |
| १३) | मातृदिन | – २४ ऑगस्ट |
| १४) | राष्ट्रीय क्रिडा दिन | – २९ ऑगस्ट |







| | | |
|---|---|---|
| १५) | राष्ट्रीय पोषक आहार दिन | – १ सप्टेंबर |
| १६) | शिक्षक दिन | – ५ सप्टेंबर |
| १७) | साक्षरता दिन | – ८ सप्टेंबर |
| १८) | जागतिक प्रथमोपचार दिन | १३ सप्टेंबर |
| १९) | हिन्दी दिवस | – १४ सप्टेंबर |
| २०) | अभियंता दिन | – १५ सप्टेंबर |
| २१) | दूरदर्शनदिन | – १५ सप्टेंबर |
| २२) | कामगार शिक्षण दिन | – १६ सप्टेंबर |
| २३) | ''ओ''झोन संवर्धन दिन | – १६ सप्टेंबर |
| २४) | जागतिक शांतता दिन | – २१ सप्टेंबर |
| २५) | जागतिक विषुवदिन | – २३ सप्टेंबर |
| २६) | जागतिक कर्णबधिर जागरुकता दिन | – २४ सप्टेंबर |
| २७) | जागतिक पर्यावरण दिन | – २७ सप्टेंबर |
| २८) | जगतिक हृदय आरोग्य दिन | – २८ सप्टेंबर |


।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

**ज्योती एन्टरप्रायझेस**

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नक्षर, गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,

फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

# चारोळ्या

१. कविता म्हणजे मनाचं,
अनुभवाचं व्यक्त होणं.
चटक्यांच्या वेदनेचं,
चुटका होवून जाणं.

२. चांदण्यांची संख्या
नाही मोजताच येत.
आईची महती
नाही शब्दांत मावत

३. मनं जुळल्याशिवाय
नातं जुळुन येत नाही.
दूर राहिल्याशिवाय
प्रेम कळून येत नाही.

४. अंधारात एक कवडसा
मनास माझ्या तुझा दिलासा
आल्या जरी किती त्सुनामी
तुझ्या किनाऱ्याचा भरवसा

**- सौ. लिना मुळ्ये पुणे.**

# वधु-वर माहिती

## वर पाहिजे

१) चि. मानसी हेमंत काशीकर
जन्म ता. २१/३/१९८९
उंची पाच साडेचार''
शिक्षण: बी. ई. (आय.टी.)
सर्व्हिस - इन्फोसिस (पुणे) येथे कामाला १ वर्षासाठी कंपनीतर्फे यू.के. ला जाऊन आली आहे.
कऱ्हाडे/कौशिक /सिंह
मो. नं. ०९८६७५९९९९०

२) स्वाती विजय वाकणकर
जन्म ता. २२/४/१९८९
उंची पाच चार''
शिक्षण: बी.ई. सिव्हिल
नोकरी खाजगी कंपनी
रक्तगट अ+
कऱ्हाडे/अत्री/तूळ मो. नं. ९३२४३४४४८३

## वधू पाहिजे

१) अमोल माधव ठाकूर
जन्म ता. १०/६/८४
शिक्षण : C.A, doing c.f.a. first level cleared.
उंची - पाच सात''
मासिक उत्पन्न १ लाख, रक्तगट ज+
नोकरी Cap Gemini Senior Consultant
कऱ्हाडे/तुला
मो. ९६१९८४७१९३/२१६३०६३८

२) सौरभ निशिकांत गोठोस्कर
जन्म ता. १७/१२/१९८५
शिक्षण : B.E. Computers
M.B.A. finance
नोकरी बँक ऑफ अमेरिका
मासिक उत्पन्न ८०,०००/-
रक्तगट अ+ , उंची: पाच दहा''
रास - कुंभ
मो. २५६३५६२७/९८३३५९५०३८

**द्वारा**
**सौ. योगिता जयंत वाकणकर**
**अे - ४०४, मारुतीदर्शन,**
**हनुमानचौक, मुलुंड-पूर्व**
**मुंबई - ४०००८१**
**मो. +९१९७६९९३४२५२**
**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड**
**विवाहमंडळासाठी**

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**
(व्यवस्थापन)
**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)
**श्रुति मंगल कार्यालय**
आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू
**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**
**दुर्गा हॉल** : पहिला मजला - ३६०० चौ. फुट
वधू-वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला - ३६०० चौ. फुट
वधू-वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४
दूरध्वनी : ०२०-२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०-२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# मुखवटा

**कोण मी? कोण मी?**
**सांगाल का? कोण मी?**
**दिधले हळवे मन म्हणोनी**
**ठरेन का कमजोर मी?**
**कोमल मन कोमल कांती**
**म्हणोनी ठरेन का अबला मी?**
**मनी माया नित्य वसते**
**उस्तवार साऱ्यांची करते**
**म्हणूनी ठरेन का फक्त गृहिणी मी?**
**वावरते मी सदैव येथे**
**करूनी धारण किती मुखवटे**
**एखादा जरी गळून पडला**
**नको कल्पना मग काय घडते !**

खरच अशा घालमेलीच्या मुखवट्यांची आपल्या साऱ्यांना कल्पना आहे, सवय आहे. पण मुखवटे आपण मोठे झाल्यावरच घालतो का? नाही! मग केव्हापासून बरं ह्या मुखवट्यांची सुरूवात झाली? आठवा. हं, बरोबर! एक वर्षाचे असल्यापासून . वर्षाच्या वाढदिवसाला मुलांना आपण निरनिराळे मुखवटे घालायला देतो. ज्या वयात मूळ चेहरा म्हणजे काय हेच कळलेलं नसतं, त्या वयात आपण त्या चेहऱ्यावर विनोदी, राक्षसी, रानटी चित्र–विचित्र मुखवटे चढवतो. ही वेळ आपल्या घरात वर्षातून एक दोनदाच येत असली तरी मित्रमंडळ, स्नेही या सर्वांकडे मिळून ती बरेचदा येते. मग मुखवट्यांप्रमाणे मुलांची वागण्याची धडपड इतर मुलांना घाबरवण्याचे प्रयत्न हे चालू होतात आपण कळ्त नकळत बालवयातच त्यांच्यावर वेगवेगळ्या मुखवट्यांचे संस्कार घडवतो.



त्यानंतर घरातच असलेल्या मुलगा आणि मुलगी यांना व्यक्ती म्हणून घडवण्याऐवजी त्यांना त्यांच्या मुलगा आणि मुलगी या मुखवट्याची ओळख सतत देत रहातो.उदा. मुलांनी बॅटबॉलच खेळलं पाहिजे, रडता कामा नये, दादागिरी केलीच पाहिजे. इतरांसमोर गप्पं बसला तर लगेच म्हटल जातं, अरे, मुलगा आहेस ना? ऐकून काय घेतोस? दे दोन ठेवुन!

तसेच मुलींपुढे भातुकलीचाच खेळ ठेवला जातो. सागरगोटे सारीपाट (सापशिडी), असे बैठे खेळ मुलींसाठी असा मुळी ठाम समजच असतो. तिने जरा मारामारी केली की तिला अडवलं जातं. आणि मुलांसारखी मस्ती काय करतेस? जरा जपून, निटनेटकी रहा ना. असं सांगून तिचा मुलीचा मुखवटा पक्का चिकटवतो तिच्या चेहऱ्यावर . असं का?

जगू द्या ना त्यांना मोकळेपणाने . ज्यात आनंद वाटतो त्या प्रमाणे. लहानपणापासून आपण अनेकविध मुखवटे धारण करत मोठे होतो. आणि तोपर्यंत आपल्याला या मुखवट्यांची इतकी सवय झालेली असते, की आपण खऱ्या कशा हेच विसरायला होतं. लहानपणाचे मुखवटे गळून यौवनातले खोडकर, लबाड, तर कधी उगीचच कठोर असलेले मुखवटे चढवून होतात.त्यातला खोडकर मुखवटा अथवा हसरा मुखवटा लोकांना छान वाटतो. पण कधी त्रस्त , कधी दुखरा, तर कधी निराश असा लपलेला मुखवटा कुणालाच दिसत नाही.

मग नवीन आयुष्याला सुरूवात होते.सहकार्यांबरोबर आणि सहचरा बरोबरचे दोन भिन्न आवश्यक मुखवटे चढवले जातात. सकाळच्या ऑफीसला जायच्या घाईत जेव्हा साथीदार एखाद्या छोट्याशा वस्तूसाठी आपल्या नावाचा हाकारा लावतो, तेव्हा वैताग, राग ह्या भावना असल्या तरी सौजन्याचा मुखवटा धारण करून त्यांना हवी असलेली वस्तू दाखवावी लागते.

कारण सकाळीच वैतागून अख्खा दिवस बिघडवायचा नसतो. नाहीतर इतरांच्या बारीक सारीक चुकाही आपण सहजपणे सहन करू शकत नाही. अन्यथा त्रास मात्र आपल्यालाच होतो.

घरातून बाहेर पडलो, की निरनिराळ्या कारणांसाठी निरनिराळे मुखवटे चढवावे लागतात. कधी सौजन्याचा, कधी समाधानाचा(?), कधी सात्विकतेचा , सोशिकता, राग, आनंद, तृप्ती, किती सांगावे? पण खरं सांगू? या साऱ्या मुखवट्या आड दडलेलं माझं खरं रूप, खरा चेहरा कुठेतरी हरवून गेला आहे. खरचं आता मी मुखवट्यांशिवाय राहू शकेन? कुणी सांगेल का? प्रत्येक व्यक्तिला जगण्यासाठी कुठल्या मुखवट्याचा वापर लहानपणापासून करायला हवा, की ज्यामुळे त्याला समाधानी तृप्त व साऱ्यांना आपल्यात सामावून घेण्याची वृत्ती वाढीला लागेल! अरे बाप रे मुखवटा नको म्हणतांना शेवटी मी पण एका चांगल्या मुखवट्याच्या शोधात आहे, असो. मिळाला असा मुखवटा तर नक्की द्या हं साऱ्यांना!

**श्रीमती स्वाती ल. प्रभुदेसाई**
**मो.९७६९३२९९९३**
**डोंबिवली**

**WITH BEST COMPLIMENTS FROM**
**मे. डी.व्ही. भाटवडेकर**
**क्लॉथ मर्चंटस्**
फोन नं. – २४४५६०४७
६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

**कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँटस्**

**अधिकृत विक्रेते**
**युनायटेड होजिअरी – कॅप्टन होजिअरी**

# ।। रेशीम गांठी ।।

करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.

**माफक फी, वेबसाईट फ्री**

**२५४६९१५८ / ९८८११५२७४६**

**वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद**

e-mail : info@reshimgathi.com

visit : www.reshimgathi.com

**सुखी वैवाहिक जीवनासाठी समूपदेशन**

**वधू-वर नोंदणी**
**पत्रिका, भविष्य**
**आणि**
**परिचय मेळावे**





# सुयश कॅटरर्स

**१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा**

**आपुलकीने सेवा देणारी माणसं**

- माऊली हॉल
- मिनी माऊली हॉल
- सर्वेश हॉल
- मंगलमूर्ती सभागृह
- ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.



**सुहास व स्वाती पंडित**
**यांचे भ्रमणध्वनी**
**९८३३३०४०३३**
**९८३३०४२७३३**

**अन्य संपर्क**
**सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८**
**योगेश कानेटकर-९८१९०३९३५९**

**संपूर्ण व्यवस्थापन**

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

## संस्थावृत्त

# संस्थेमध्ये वासंतिक संमेलन व सामुहिक व्रतबंध कार्यक्रम संपन्न

प्रदीप श्री. हळबे –

वर्षभरातील कार्यक्रमांची सुरूवात वासंतिक संमेलनाने होते. रविवार दि. २० एप्रिल २०१४ रोजी दु. ४.०० वा. ब्राह्मण सभा, दत्तमंदिर, वडवली अंबरनाथ (पूर्व) येथे या वर्षीचे वासंतिक संमेलन संपन्न झाले. पॅरागॉन टॅप चेंजर्स प्रा. लि. कंपनीचे उद्योजक श्री. हेमचंद्र हर्डीकर हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दीप प्रज्वलन व सौ. मृणाल ठाकूरदेसाई यांच्या ईशस्तवनाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. अरुण नाटेकर यांनी पाहुण्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. सौ. रुपा बिटकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्री. सुरेश हर्डीकर यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सरकार्यवाह श्री. सुहास म. पंडित यांनी संस्थेविषयी सविस्तर माहिती देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या भाषणात नि:स्वार्थी सेवाभावी कार्यकर्ते तयार करून ज्ञाती–विरहीत उपेक्षीत व गरजू समाजाची सेवा करा असे मार्गदर्शन केले.

अंबरनाथमधील ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांचे गुणगौरव; संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. अरुण नाटेकर यांचे हस्ते करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचा शिल्पकार आनंद प्रभुदेसाई तसेच सुप्रसिद्ध तबला वादक कुमार ओंकार पाध्ये व कुमारी गायत्री पाध्ये या भावंडांचा स्मृतिचिन्ह, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पाध्ये भावंडांचा परिचय सौ. शुभदा पाध्ये यांनी करून दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. अरुण नाटेकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या कार्याचा उल्लेख केला. दर तीन महिन्यांनी अंबरनाथ, ब्राह्मण सभा व कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली यांचे मार्फत रक्तदान शिबीर आयोजित केले जाते याची जबाबदारी डॉ. पाटगांवकर सांभाळतात. जमा झालेले रक्त टाटा हॉस्पिटल मुंबई येथे पाठविले जाते. गरजू लोकांना वैद्यकीय मदत दिली जाते. त्याचप्रमाणे शैक्षणिक उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या होतकरू विद्यार्थ्यांना मदत दिली जाते. याशिवाय दानव्रत प्रकल्प, कुटुंब कल्याण योजना, वधू–वर सूचक केंद्र, वाचनालय इत्यादी उपक्रम संस्थेतर्फे चालविले जातात त्यासाठी सर्व ज्ञातीतील बांधवांनी व दानशूर व्यक्तिंनी सढळ हस्ते देणग्या देऊन उपकृत करावे असे आवाहन केले.

श्री. अभिजीत सरपोतदार यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाच्या पहिल्य सत्राची सांगता झाली. मध्यंतरामध्ये सर्वांना आंबेडाळ व पन्हे देण्यात आले. कार्यक्रमांतर्गत चैत्रगौरीची छान आरास केली होती. चैत्रगौरीची सजावट सौ. अपर्णा नवरे, सौ. शुभदा पाध्ये, सौ. नम्रता देसाई, सौ. नीला अमृते व सौ. वर्षा प्रभुदेसाई यांनी केली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये शास्त्रीय संगीतात पारंगत असलेल्या सौ. मंजुषा कुलकर्णी पाटील यांचा नाट्यगीतांचा बहारदार कार्यक्रम झाला. सुमारे २५० सभासद बंधु–भगिनींनी कार्यक्रमाचा लाभ घेतला. डोंबिवली ते बदलापूर पर्यंतचे ज्ञाती बांधव कार्यक्रमाला आले होते. सर्वांनी कार्यक्रम खूप छान झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. रात्रौ ८.३० नंतर श्री. काणे केटरर्सच्या सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे नियोजन, रुपरेषा, जाहिराती प्रसिद्धीसाठी नगरप्रमुख श्री. सुरेश हर्डीकर कार्यकारिणी कार्यवाह श्री. प्रसाद देसाई आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांची अतिशय मेहनत घेतली. त्यांना सांस्कृतिक समिती प्रमुख श्री. केदार पाध्ये यांचे मार्गदर्शन लाभले.

अशाप्रकारे सर्वांच्या सहकार्याने वासंतिक संमेलन आनंदाने पार पडले. दि. ९–५–२०१४ रोजी संस्थेचा पहिला सामुहिक व्रतबंध कार्यक्रम संपन्न झाला. त्यामध्ये ४ मुंजी झाल्या एकूण १२५ लोकांची उपस्थिती होती. कार्यक्रम सकाळी ७ वाजता सुरू झाला व ठीक १२.३० वाजता धार्मिक विधी संपन्न होऊन त्यानंतर भोजनाचा व भिक्षावळीचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी सर्वांनी सहकार्य केले विशेष करून, श्री. सुहास पंडित, डॉ. अरुण नाटेकर, सौ. शुभांगी पुसाळकर, श्री. विनायक जांभेकर तसेच वेदमूर्ती श्री. मनोज चांदोरकर व वेदमूर्ती श्री. प्रदीप रायकर, वेदमूर्ती श्री. अमोल आठले यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच श्री. संदिप पुराणिक, श्री. सुधाकर नवरे, श्री. प्रदीप हळबे, सौ. धामणकर, सौ. जोशी, सौ. फळसळकर, सौ. मुळे या सर्वांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. डॉ. अरुण नाटेकर यांनी व्रतबंध म्हणजे काय याविषयी सर्वांना माहिती दिली व वेदमूर्ती श्री. प्रदीप रायकर यांनी व्रतबंध या धार्मिक विधीची सर्व माहिती उपस्थितांना सांगितली.

यानंतर डॉ. अरुण नाटेकर व श्री. सुहास पंडित यांनी उपस्थितांचे व या कार्यक्रमाला ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांचे आभार मानले.


*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

## संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या बेळगाव येथील सभेचा वृत्तांत

रविवार दि. २२ जून २०१४ रोजी खानापूर जि. बेळगाव येथे सभा पार पडली. या सभेचे यजमानपद बेळगाव संघाने स्वीकारले होते व मागच्या मुंबई येथील सभेप्रमाणेच अतिशय नियोजनबद्ध पार पाडले. या वेळचे वैशिष्ट्य म्हणजे बेळगाव संघाने बाहेरून येणाऱ्या सर्व प्रतिनिधींची व्यवस्था बेळगाव येथील हॉटेल मध्ये केली होती.

सभेचे ठिकाण बेळगाव पासून सुमारे ३० कि. मी. अंतरावर होते. तेथे जाण्या येण्याची व्यवस्था देखील बेळगाव संघाने केली होती. नंतर बेळगाव संघाचे अध्यक्ष श्री. सी.पी. जोशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. बेळगांव संघाच्याच तरुण कार्यकर्त्यांनी मंत्रपठण करून वातावरण भारून टाकले. श्री. आनंद पराडकर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारून सभेस सुरुवात केली. श्री. सी.पी.जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

प्रथम १. कै. सदानंद किर्लोस्कर (सोलापूर), २. कै. मनोहर येल्लापूरकर (बेळगाव) ३. श्री. सरवटे(नागपूर) ४. कै. दीपश्री जोशी (कोल्हापूर) आणि ५. श्री. हळबे (डोम्बिवली) या सभासदांच्या दु:खद निधनाबद्दल एक मिनिट स्तब्धता पाळण्यात आली. विषय सूची प्रमाणे श्री. आनंद पराडकर, अध्यक्ष यांनी प्रास्ताविक केले. महासंघाचे अस्तित्व आणि संपर्काची वाढ करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. नंतर श्री. गणेश गुर्जर (पुणे) यांनी २०१३-१४ चे कच्चे जमा खर्च व ताळेबंद सादर केला. या काळात कोषाध्यक्ष श्री. सी.पी.जोशी आजारी असल्यामुळे ते हे काम करू शकले नव्हते. या विषयावर श्री. हर्डीकर(डोम्बिवली) यांनी अशी सूचना केली की सदरहू माहिती ८ दिवस तरी अगोदर प्रत्येक संघाकडे यावी जेणे करून त्याचा अभ्यास करून सभेला हजर राहता येईल. श्री. सुहास गुर्जर (बेळगाव) यांनी जमा खर्चामध्ये बाजू उलट सुलट दाखवल्यात असे निदर्शनास आणून दिले. ही चूक अंतिम ताळेबंद बनवताना सुधारण्यात येतील असे आश्वासन दिले. यानंतर आलेल्या प्रत्येक प्रतिनिधीने आपापली ओळख करून दिली. यामध्ये बेळगाव, नागपूर, पुणे, रत्नागिरी, डोम्बिवली, शिरसी, ठाणे, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर संघांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. मुंबई, मुलुंड, हुबळी कासारगोड मंगलोर बंगलोर सातारा, नाशिक, बडोदा, आणि इंदूर यांच्या अनुपस्थितीची प्रकर्षाने जाणीव झाली. यानंतर संपर्क या विषयावर सविस्तर चर्चा झाली. वर्गणीदार संख्या वाढणे आवश्यक असल्याबद्दल एकमत होते.

यानंतर कार्यवाह श्री. भाटवडेकर यांनी मागील सभेपुढे झालेल्या चर्चेतील मुद्दयानुसार




काय प्रगती झाली आहे याची सभागृहाला माहिती दिली. महासंघाची नोंदणी व पॅन कार्ड याबाबतीतले अर्ज संबंधित कार्यालयात दाखल केले आहेत. वेबसाईट याविषयाबाबत काही प्रगती झाली नाही. याकरता १०/१५ हजाराची तरतूद मागील सभेत करण्यात आली आहे. ही वेबसाईट झाल्यानंतर अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी श्री. भाटवडेकरांनी सांभाळण्याची स्वीकारली आहेच. 'संपर्क'च्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतल्यानंतर वर्गणी सध्या तरी आवश्यकता नाही असे एकमताने ठरवण्यात आले. महासंघाची घटनेला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे व ती घटना धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्यात येईल. देणगीदार जर रोखे वगैरे स्वरुपात देणार असेल तर डी मॅट खाते उघडावे लागेल. परंतु अजून पॅन कार्ड नसल्यामुळे या बाबत आज तरी काही करू शकत नाही. शिरसी चे श्री. माधव स्वादि यांनी महासंघाचे सभासद झाल्याने काय फायदा असा प्रश्न उपस्थित केल. यावर महासंघाकडून यनंतर जेवणाचा मध्यंतर घेण्यात आला. नंतर श्री स्वादि यांनी आपली माहिती सांगण्यास सुरवात केली. सध्या ते ३ जिल्ह्यात काम करत आहेत. यासाठी हुबळी आणि बेळगाव संघ सहाय्य करत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र ग्रामीण व विस्तृत असल्याने खूप अडचणीव येतात. तरीदेखील ३ जिल्ह्यातील २७० परिवारापैकी २२० जणांना सभासद करू शकले आहेत. दरडोई फक्त रु. १००/- गोळा केले आहेत. वर्षातून एकदाच मेळावा घेतला जातो. अशा संघाला आर्थिक मदत करणे आवश्यक आहे याबद्दल एकमत झाले. शिरसी हा संघ महासंघाचा प्रथमच सभासद होत आहे.

यानंतर श्री. मनिष नवाथे(नागपूर), श्री. पावनगडकर (कोल्हापूर), श्री. हळबे(रत्नागिरी), श्री. हर्डीकर (डोम्बिवली), श्री. माईणकर(सोलापूर), श्री. खांडेकर(सांगली), श्री. गुर्जर(पुणे) आणि श्री. जोशी (बेळगाव) यांनी आपापल्या संघाचे सध्या चालू असलेले कार्य विस्तृतपने निवेदन केले. यामुले इतरत्र काय चालू आहे याची कल्पना आली व त्यापैकी आपल्याला काय घेता येईल याचा उपस्थित सभासदांनी विचार नक्कीच केला असेल. विषय सूची संपल्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने खुली चर्चा करण्यात आली. श्री. फणसळकर(पुणे) यांनी शिरसी संघाला महासंघाच्या वतीने शक्य ती मदत करावी अशी सूचना केली. सौ. हळबे(रत्नागिरी) व सौ. माईणकर (सोलापूर) यांनी स्वरचित कवितांचे वाचन करून आपल्या अंगी असलेल्या प्रतिभेचा परिचय करून दिला. श्री. हेमंत बोंद्रे(बेळगाव) यांनी याप्रसंगी सर्व ब्राह्मण एकत्र यावे अशी सूचना केली. श्री. चंद्रकांत जोशी (बेळगाव) यांनी 'संपर्क' साठी तह हयात वर्गणीदार होता येईल का याची पडताळणी करावी अशी सूचना केली. रु. १०००/- अशी वर्गणी असावी असे प्रतिपादन केले. महासंघाची वेबसाईट लवकरात लवकर व्हावी असे सांगितले. यानंतर श्री. गुर्जर(पुणे) यांनी यजमान महासंघाच्या सभा आयोजित करण्यास उद्युक्त होतील. या सूचनेला एकमुखी पाठिंबा मिळाला. अधिक विषय नसल्यामुळे अध्यक्षांनी आभार प्रदर्शन करून सभा संपल्याचे जाहीर केले. यानंतर सभासदांनी पुढील सभेचे स्थळ कोठे असणार आहे याची विचारणा करण्यांत आली. त्यावर पुढील डिसे. जाने.ची वार्षिक सभा नागपूर येथे तर जून-जुलै ची रत्नागिरी येथे घेण्याची तयारी या दोन्ही संघानी दर्शविली.

# अभिनंदनीय !

**नवनिर्वाचित केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांचा सत्कार**



मा. श्री. प्रकाशजी जावडेकर यांची, पंतप्रधानमा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये केंद्रीय पर्यावरण, माहिती व सूचना प्रसारण राज्यमंत्री म्हणून निवड झाली. कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे आणि भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास ही अत्यंत अभिमानास्पद आणि गौरवपूर्ण घटना आहे. या निमित्ताने मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. प्रकाशजी जावडेकर यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांच्या या पुढील कारकिर्दीस हार्दिक शुभेच्छा. मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. प्रकाशजी जावडेकर हे मंत्री झाल्यानंतर प्रथमच पुण्यात आले असताना कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे आणि भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने त्यावेळी, महासंघाचे सचिव श्री. गोपाळ भाटवडेकर, पुण्याच्या संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर. विश्वस्त मंडळाचे सदस्य, श्री. मकरंद फणसळकर, श्री. हेमंत पुराणिक, श्री. श्रीधर पंतवैद्य, श्री. श्रीकांत गुर्जर आणि रोटरियन श्री. नंदकुमार सप्रे उपस्थित होते.

# सुनिल मनोहर जठार

सुनिल मनोहर जठार हे 'मनसे' चे नेते, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आहेत. त्यांना ५० हून जास्त विविध संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. जठार यांना सन २०१३-१४ मध्ये प्राप्त झालेले पुरस्कार पुढीलप्रमाणे

१)हुतात्मा अपंग बहुउद्देशिय विकास कल्याणकारी संस्था, कराड चा ''तृतीय कोकण पुरस्कार'' २०१३ (सन्मानपत्र व सन्मानचिन्ह)

२)रविकिरण बहुउद्देशिय विकास संघ सांगलीचा राज्यस्तरीय रविकिरण ''समाजश्री''पुरस्कार (सन्मानपत्र व सन्मानचिन्ह)

३)प्रगती महिला शैक्षणिक सामाजिक विकास संस्था नाशिक, चा ''समाजभूषण '' पुरस्कार (सन्मानपत्र व सन्मानचिन्ह)

४)विश्व समता कला मंच संगमेश्वर-रत्नागिरीचा सुनिल जाधव स्मृती राज्यस्तरीय ''विश्व समता'' पुरस्कार २०१४ (सन्मानपत्र व सन्मानचिन्ह)

५)साई प्रतिष्ठान, साईधाम बिजघर-खेड-रत्नागिरीचा ''शहीद मंगेशकुमार भोसले स्मृती गौरव'' पुरस्कार २०१४ (सन्मानपत्र व सन्मानचिन्ह)

माननीय श्री सुनिल जठार यांचे हार्दिक अभिनंदन!

# नचिकेत धनंजय सप्रे

नचिकेत धनंजय सप्रे याची औरंगाबाद येथील, सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट येथील शिक्षणक्रमासाठी निवड झाली आहे. या शिक्षणासाठी महाराष्ट्रातून सुमारे ४००० विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातून फक्त ५० विद्यार्थ्यांची निवड होते. लेखी परीक्षा व मुलाखतीतून निवडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नचिकेतचा तेरावा क्रमांक आला.

दि. ९ जून पासून त्यांचे शैक्षणिक कार्य सुरू झाले आहे. या मुलांची ११वी ची सोय औरंगाबाद येथील उत्कृष्ठ महाविद्यालयात(वसतिगृहासह) केली आहे. चि. नचिकेतचे संपर्क परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

# चाबूक श्वासोच्छ्वासांचा

एक बैलगाडी आणि गाडीवान आणि त्याच्या हातात चाबूक बैलगाडी चालत आहे आणि तरी सुद्धा गाडीवान बलिंना आपल्या सवयीप्रमाणे फटके मारीत आहे. प्रथम तो गाडी पळवण्यास बैलांना फटके मारीत असे पण नंतर त्याची सवय झाली आणि म्हणून तो बैलांना सवयीनुसार ५०-१०० असे फटके मारीत असे. आता गाडीवानाची जागा ठराविक बैलगाडीच्या बैलांचे व गाडीवान यामधील अंतर ठराविक त्यामुळे एक ठराविक ठिकाणीच बैलांना फटके बसत आणि त्यामुळे जखमा होत नंतर व्रण आणि त्यानंतर काय याचा विचारच न केलेला बरा!



आता तुम्ही म्हणाल की, याचे इथे काय प्रयोजन? आहे प्रयोजन आहे. मानवी जीवनांत असेच फटके मारणारा मानवी देहातला गाडीवान म्हणजे आपल्या श्वासोच्छ्वास व आपण त्यांनी स्वत:च्या शरीराच्या आंत जखमा करतो.

आता हे कसे काय? म्हणजे श्वासोच्छ्वास करायचाच नाही कां? हो तर श्वासोश्वास घ्यायचा तर रागाने घ्यायचा का एखाद्या भात्यासारखा? किंवा दु:खाने हुंदका देत? किंवा ओठ चावत, किंवा संतापापोटी, उष्णतेचा, एखादे वेळी राग येणे ठीक आहे अथवा चीड येणे किंवा रागाने श्वासोच्छ्वास घेणे. ठीक पण स्वभावच रागीट होणे, चिडका होणे किंवा भडका होणे हे त्या श्वासोच्छ्वास विकृत दिशेने वाहण्यास कारणीभूत ठरतात आणि श्वासाचा परिणाम एकत्र. त्यातील उष्णघाव मानवाच्या शरीराच्या आतील मऊ असलेल्या एखाद्या अवयवावर पडून राहणार आणि स्वभाव न बदलल्याने, श्वास वाहत राहून वण करीत राहणार. या व्रणांचे रोग होण्यास कित्येकसा वेळ लागणार? रोगांची कारणे पाहिली तर लक्षात येईल की, दु:खाचेच दुखणे होते कारण देहाचा ताण, मनाचा मन:स्ताप व बुद्धीचा संताप ही सारी दु:खे शरीरात दुखण्याचे स्वरुप होतात. कारण जसा संताप तसाच संतापी श्वास म्हणून, श्वासावर चांगले संस्कार हवेत म्हणजे श्वासाचा प्रवाह निर्मळ होतो आणि म्हणूनच मोकळा निर्मळ आणि स्वच्छ व सुंदर वातावरणात घेतलेला श्वासोच्छ्वास हा खरा निरोगी जीवनाची किल्ली.

**- सौ. स्वाती हिर्लेकर, पुणे**



आपल्यातील एकही दोष लक्षांत न येण हा सर्वात मोठा दोष.

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ , मुलुंड – तृतीय वर्धापन दिनानिमित्त

# 'स्पर्श दिव्यत्वाचा' – नाट्यसंगीताचा बहारदार कार्यक्रम

''कऱ्हाडे ब्राह्मण संघ–मुलुंड'' संस्थेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त 'स्पर्श दिव्यत्वाचा' हा नाट्यसंगीतावर आधारित कार्यक्रम ''कालीदास नाट्यमंदिर मुलुंड'' येथे दि. २७/४/२०१४ रोजी दिमाखात साजरा झाला.

नाटककार कै. मा. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी नांदीची सुरुवात केली आणि सध्याचा तरुण संगीतकार कौशल इनामदार यांनी बालगंधर्व सिनेमाला संगीत दिले. या दोघांच्या काळात आपल्या ज्ञातीतील अनेक लोकांनी खूप मोठं कार्य केलंय, संगीत क्षेत्र बहरून आणलंय. या सर्वांना एकत्र आणून त्या विषयीची संकल्पना आमचे उत्साही सदस्य; श्रीपाद सप्रे यांच्या मनांत तयार होत गेली आणि पं. प्रदीप नाटेकर सर व वीणाताई नाटेकर यांनी ती शब्दरुप केली. कऱ्हाडे ज्ञातीतीलच नाटककार–गीतकार–संगीतकार–गायक–गायिका–वादक–निवेदक या सर्वांना एकत्र आणून 'स्पर्श दिव्यत्वाचा' हा ४ तासाचा अविस्मरणीय कार्यक्रम ''दृकश्राव्य'' माध्यमाद्वारे सुमारे ५०० जणांच्या उपस्थितीत साजरा झाला.

''ज्ञ ते ज्ञ'' म्हणजे किर्लोस्कर ते कौशल ही संकल्पना घेऊन बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर, बाळकोबा नाटेकर, शेवडे, देवगंधर्व भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, वि. सि. गुर्जर, बकुळ पंडित, बापूसाहेब पेंढारकर (भालचंद्र पेंढारकर) पं. जितेंद्र अभिषेकी, शं.ना. नवरे, प्रा. वसंत कानेटकर, प्रभाकरपंत पणशीकर आणि कौशल इनामदार अशा देवतुल्य लोकांनी निर्माण करून ठेवलेलं संगीत क्षेत्रातील वैभव दृकश्राव्य माध्यमाद्वारे मनोज आचार्य यांनी जिवंत केलं. पं. प्रदीप नाटेकर, मृणाल नाटेकर–भिडे, योजना शिवानंद, निलाक्षी पेंढारकर आणि रोहित कालसेकर या गायक–गायिकांनी सूर–ताल आणि शब्दांच्या माध्यमातून साकार केलं.

''पंचतुंड नररुंड मालधर या नांदीपासून वेड्या मना तळमळसी, राधाधरमधुमिलींद, वद जाऊ कुणाला शरण, स्वकुल तारक सुता, नाथ हा माझा, खरा तो प्रेमा, देहाता–शरणागता, झर्णी देकर या, – उगवला चंद्र पुनवेचा, सूरगंगा–मंगला, निर्गुणाचा संग, अवघे गरजे पंढरपूर, गर्द सभोती, देवाघरचे ज्ञान कुणाला, घेई छंद मकरंद आणि चिन्मया सकळ हृदया'', या भैरवीपर्यंत गाण्यांना आपल्या वादन कौशल्याने अधिक सुंदर केले ते. तबला–धनंजय पुराणिक; ऑर्गन –केदार भागवत यांनी! मनोज आचार्य, अरुंधती पंडित, लीना पंडित यांनी विषयानुरुप निवेदन केलं.

प्रारंभी कार्यवाह माधुरी शेंबेकर यांनी प्रास्ताविकात मुलुंड संघकार्याची आणि एकूण कार्यक्रमाची माहिती दिली. श्री. अविनाश तथा अ. रा. तांबे (मुंबई संघाचे माजी अध्यक्ष) हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. शाल व श्रीफळ देऊन त्यांचे स्वागत अध्यक्ष मंडपे यांनी केले.

वयाच्या ३ऱ्या वर्षी मुलुंड– कऱ्हाडे ब्राह्मण संघाने घेतलेल्या या भरारीबद्दल श्री. तांबे यांनी कौतुक केले आणि संघाला देणगीही दिली.

संघ सदस्य श्री. माधवराव शेंबेकर यांनी संघाला पत्नी कै. सौ. मालती शेंबेकर यांच्या स्मरणार्थ रु. ५०,०००/–ची देणगी दिली. चैत्र महिन्यातील 'डाळपन्हे' हा कार्यक्रम या देणगीतून नियमित व्हावा अशी ईच्छा प्रदर्शित केली. शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान श्री. तांबे यांनी केला. अशोक खांडेकर यांनी यथोचित सर्वांचे (जाहिरातदार, देणगीदार सर्व प्रकारच्या व्यवस्था पहाणारे व्हॉलेंटिअर्स आणि उपस्थित रसिक) यांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने १५ नवीन सभासद झाले. प्रफुल्लीत चेहऱ्याने प्रेक्षक नाट्यगृहाबाहेर पडत होते हेच या कार्यक्रमाचे यश.

या कार्यक्रमाच्या सी.डी. उपलब्ध आहेत. (माधुरी शेंबेकर मो. ९८६९०४९८५२)

### पैलवान

एका अपघातात पैलवान आंधळा झाला. त्याचवेळी आर्मीत भरती सुरू झाली व तो तेथे इंटरव्ह्यू द्यायला गेला.
इंटरव्ह्यू घेणाऱ्या ऑफिसरने त्याला विचारले, ''तू इथे कोणत्या पोस्टसाठी आला आहेस?'' पैलवानाने उत्तर दिले, ''अंदाधुंद फायरिंग करणाऱ्याच्या.''


**निकेत फोटोज्**

**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

## संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे संस्थेचा वासंतिक महोत्सव संपन्न

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे, यांचा वासंतिक महोत्सव, शनिवार दि. २६ एप्रिल, २०१४ रोजी नेहमीप्रमाणे श्रुति मंगल कार्यालय येथे पार पडला.

या वेळचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमाची वेळ संध्याकाळच्या ऐवजी सकाळी ठेवण्यात आली. हा बदल सभासदांच्या सूचनेवरून प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आला होता. दूरवर राहणाऱ्या सभासदांना रात्री जातांना वाहनाची व्यवस्था होत नव्हती म्हणून हा बदल करण्यात आला. पेयपान या प्रसंगी सौ. माधुरी गुर्जर व सौ. भाग्यश्री अभ्यंकर यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. वेगवेगळ्या प्रकाराची सुरेल गीते गाऊन त्यांनी उपस्थित सभासदांना मंत्रमुग्ध केले होते. यानंतर त्यांनीच पसायदान गाऊन कार्यक्रमाची सांगता केली.

श्री. खानवलकर यांनी आभार प्रदर्शन केले. व श्री. देसाई यांनी सूत्रसंचालन पार पाडले.

## झाशीराणी लक्ष्मीबाईसाहेब – यांच्या स्मृतीस अभिवादन



रणरागिणी झाशी राणी लक्ष्मीबाई यांचा स्मृती दिन दि. १८ जून रोजी असतो. या प्रसंगी कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे तर्फे दि. १८ जून २०१४ रोजी जंगली महाराज रोड वरील बालगंधर्व रंगपरिसरामधील झाशी राणीच्या अश्वारुढ पूर्णाकृती पुतळ्यास संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर आणि मा. नगरसेविका सौ. माधुरी सहस्त्रबुद्धे यांनी पुष्पहार अर्पण केला. या प्रसंगी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या विश्वस्त मंडळातील विश्वस्त श्री. गोपाळ भाटवडेकर, श्री. मकरंद फणसळकर, श्री. नंदकुमार सप्रे, श्री. सुहास खानवलकर आणि संघाचे सभासद उपस्थित होते. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी राणी लक्ष्मीबाई यांना अभिवादन केले.

## दु:खद निधन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ सोलापूर चे संस्थापक अध्यक्ष श्री. सदानंद किर्लोस्कर यांचे नुकतेच निधन झाले. कऱ्हाडे ब्राह्मण संघ सोलापूरच्या यशस्वी कारकिर्दीमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यांच्या दु:खद निधनाने सोलापूर संघाचे आणि पर्यायाने महासंघाचे अपरिमीत नुकसान झाले आहे.

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ किर्लोस्कर कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो!

**मनुष्य जीवनात आलेल्या प्रत्येकाने तीन 'गिफ्टसचा' स्वीकार करण्यास कधीही नाही म्हणायचे नाही....**

**१) प्रेयसी – देवाने दिलेले गिफ्ट**

**२) आई–वडील – गिफ्ट रूपात आलेला देव**

**३) मित्र – जे देवालाही मिळत नाही**


**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**



फणसळकर

कोंकण काजू

उत्पादक :

कोकण काजू सांडगी मिरची

फणस–तळलेले गरे काजूकतली

प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

# 'त्याचे महत्व आता जाणवतंय....'






लहानपणी सक्तीने एरंडेल पाजले जायचे, बुळबुळीत लागले तरी गिळावेच लागायचे
नंतर लोटापरेड होणे अनिवार्य असायचे, आज उतारवयातही पचनशक्ती उत्तम आहे
त्या एरंडेलाचे महत्त्व आत्ता जाणवतंय ।।१।।
लहानपणी पाढे तोंडपाठ करावे लागायचे, ओव्या, कविता, श्लोक घोकावेच लागायचे
सनावळ्यांनाही विशेष महत्त्व असायचे, आज उतारवयातही स्मरणशक्ती उत्तम आहे
त्या पाठांतराचे महत्त्व आता जाणवतंय ।।२।।
लहानपणी शाळेत पायी जावे लागायचे, कॉलेजसाठी सायकलशिवाय वहान नसायचे
सगळे खेळ पण भरपूर धावपळीचे असायचे, आज उतारवयातही अंगकाठी सडसडीत आहे
त्या पायपीटीचे महत्त्व आता जाणवतंय ।।३।।
लहानपणी जेवणात आवडनिवड नसायची, वरण, भात, भाजी, आमटी खावीच लागायची
ताजे ताक, फोडणीच्या पोळीचीही सक्ती व्हायची, आज उतारवयातही भूक, बीपी, शुगरचा त्रास नाही
त्या चौरस आहाराचे महत्त्व आता जाणवतंय ।।४।।
लहानपणी खोटे बोलायची शामत नसायची, फुकटचे कही घेतले तर शिक्षाच व्हायची
उधार-उसनवारी लाजीरवाणी वाटायची, आज उतारवयातही स्वाभिमानाने जगतो आहे
त्या शिकवणीचे महत्व आत्ता जाणवतंय ।।६।।
लहानपणी अभ्यास स्वत:च करावा लागायचा, ट्यूशन - गाईड - कॉपीचा तर विटाळच असायचा
कमी मार्क मिळाल्यावर मारच खावा लागायचा, आज उतारवयातही बुद्धी भ्रष्ट झाली नाही
त्या स्वाध्यायाचे महत्व आत्ता जाणवतंय ।।७।।
लहानपणी मोठ्यांचा मान राखावा लागायचा, उलटउत्तर देण्याचा तर प्रश्नच नसायचा
मग रागावलेला माणूसही आशिर्वाद देऊनच जायचा, आज भरल्या घरात अत्यंत सन्मानाने रहातोय
त्या संस्कारांचे महत्त्व आत्ता जाणवतंय ।।८।।
लहानपणी शिस्तीसाठी आईचा धपाटा खाल्ला, किशोरवयात त्यासाठीच वडिलांकडून खाल्ला
शाळेत प्रत्येक चुकीला शिक्षकांकडूनही खाल्ला, आज उतारवयातही शिस्तबद्ध जीवन जगतोय
त्या खाल्लेल्या माराचे महत्त्व आत्ता जाणवतंय ।।९।।
लहानपणी एकत्र कुटुंबपद्धती असायचे, घरोघरची आई 'श्यामची आई'च असायची
वडिलांची करडी नजर, प्रेमापोटीच असायची, आज त्यांची उणीव ठायीठायी जाणवतेय
त्यांच्या वात्सल्याचे महत्त्व आत्ता जाणवतंय ।।१०।।
लहानपणेवे वाढदिवस साधेपणाने साजरा व्हायचा, एखादेच चॉकलेट, पण मोठ्यांचा आशिर्वाद मिळायचा
आई-बाबा-आजीचा हात मस्तकावरून फिरायचा, आज दीर्घायुष्याची वाटचाल आरामात चालतोय
त्या आशिवार्दाचे महत्त्व आत्ता जाणवतंय ।।११।।

**अविनाश हळबे, पुणे**
**सी २३, स्वरांजली, सर्व्हे- नं. ११०/२, शिवतीर्थनगर**
**कोथरूड, पुणे - ४११ ०३८**
**मो. ९०११०६८४७२, दूरध्वनी ०२०-२५३८१९५३**

# मित्र आणि मैत्री

आजकालच्या वाढत्या गर्दीत व नागरी जीवनात माणूस मैत्री गहाळ करून बसला आहे. तो लोकनेता होऊ शकतो, अधिकारपद भूषवू शकतो, धनसंपदेचे डोंगर उभे करू शकतो पण जिवाभावाचा मित्र मिळवू शकत नाही. तसा माणूस माणसांनी वेढलेला असतो, पण त्याला कोणी सखा नसतो. भरल्या समुद्रात व्याकुळ व्हावे अशी ही दशा असते. रोजच्या जीवनात वरवरच्या गाठीभेटी, हसणे, खेळणे, खाणेपिणे अशा तोंडदेखल्या उपक्रमांना ऊत आला आहे. समोर गोड बोलणे, मागे टवाळी करणे, स्वत:ला कसलीही झळ लागू न देणे, मैफल किंवा मेजवानी चुकू न देणे हे वर्तनप्रकार वेगाने वाढू लागले आहेत. माणसे एकमेकांना खेटून उभी असतात. त्यांची मने मात्र एकमेकांपासून दूर असतात.

ज्ञानदेवांनी पसायदानात अशी प्रार्थना केली आहे की, 'भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे' भगवान बुद्धांनी मैत्री, मुदिता व करुणा या भावनांना आवाहन केले. मैत्री ही एक सद्‌भावना आहे. तो एक दृढ भावबंध आहे. मानवी मनाची ती भूक आहे.

माणसाला माणसाइतके काहीच प्रिय नसते. मैत्री ही विशिष्ट वयात जमते. जेव्हां जीवनात अन्य हव्यास वाढीस लागलेले नसतात. जबाबदारीचा गुंता नसतो त्या वयात मैत्री मनात मूळ धरते व घर करते. बोलण्यामुळे मैत्री वाढते. मन मोकळे करण्यामुळे लाभणारी प्रसन्नता केवळ मैत्रीच देऊ शकते. परस्परांविषयी वाटणारी ओढ आणि गाढ विश्वास हा मैत्रीचा आधार असतो.

आजच्या वेगवान जीवनात परस्परांना योगायोगाने माणसे वारंवार भेटत राहतात. सकाळी फिरणाच्या वेळी, दुपारी कार्यालयात, सायंकाळी सभेत किंवा हॉटेलमध्ये माणसे एकमेकांपुढून सरकत असतात. लायन्स, रोटरी, सार्वजनिक सभा अशा संस्थात्मक संदर्भात होणाऱ्या गाठीभेटीत सातत्य असते. पण त्यातून उत्कट व्यक्तिगत स्नेह निर्माण होईलच असे नाही.

सहवासापेक्षा अशा भावनिक उत्कटतेने एकमेकांना भेटणे, परस्परांशी हितगुज करणे, काही क्षणांचे आंतरिक अद्वैत अनुभवणे ही मैत्रीची लक्षणे होत. महात्माजी म्हणत, ''मैत्री, म्हणजे भावभावनांची समरसता व व्यक्तिमत्त्वांची समरुपता.''

खऱ्या मैत्रीत कसलेच गठित नसते, जमाखर्च नसतो, असते ती लाभवीण केली जाणारी प्रीती! अशी मैत्री ही एक प्रकारची भावशक्ती असते. 'सख्य' हा भक्तिप्रकार नवविधा भक्तीत अंतर्भूत होतो.

मैत्री ही कोणी, कोणाशी व कशासाठी करावी? मैत्री ही तशी निरपेक्ष असते. योगायोगाने ती जमते. जुळतेमिळते स्वभाव मैत्रीला पोषक ठरतात. खरी मैत्री ही उघड, सरळ व पारदर्शक असते. ती मिरवावी लागत नाही किंवा लपवावी लागत नाही. मैत्री ही सदैव समानेच्या पातळीवर नांदते. तिला विषमतेचे वावडे असते. कृष्ण आणि अर्जुन, कृष्ण आणि सुदामा यांच्यात मैत्री होऊ शकते. जेथे लाचारी नसते तेथेच मैत्री वावरते. सत्ताधीशांच्या दारात आणि धनवंतांच्या अंगणात माणसे गोळा होतात ती कामानिमित्त, स्नेहापोटी नव्हे. मैत्री हा एक भाव आहे. भूमिका आहे. तो एक संबंध आहे. तसाच धर्मही आहे. आईचे प्रेम, बहिणीची माया, वडिलांचा आधार या भावनिक संबंधांचे सार मैत्रीत सामावलेले असते. स्वार्थरहित ओढ, सुखदु:खात घडणारा सहभाग, प्रांजळपणे केलेले बोलणे हे मैत्रीचे रंग असतात.

अशी मैत्री मुलामुलींत किंवा स्त्री–पुरुषात असू शकते का? तत्त्वत: ती सहजशक्य आणि अधिक आनंदायक आहे. पण सामाजिक दुराग्रहमुळे व मनुष्यसुलभ व दुर्बलतेमुळे अनेकांना ती पेलत नाही. शुद्ध स्नेह आणि उदात्तरम्य स्त्रीत्व यांची युती ही एक आवश्यकता आहे. पुरुषाच्या मनोवृत्तीत थोडे तरी स्त्रीत्व असावे. स्त्रीच्या वृत्तीत थोडे तरी पोलाद असावे. देवालासुद्धा अर्धनारीनटेश्वर होण्याचा मोह पडतो. मग माणसांच्या जगात अशा मैत्रीला स्थान का नसावे?

संवेदनक्षम तंतुवाद्याची एक तार छेडली तर जवळ असणाऱ्या वाद्यांच्या तारा झंकारतात. मैत्रीच्या तारा अशाच असतात. त्यामुळे जीवनसंगीत संभवू शकते. ज्यांना मित्र असतील त्यांनी ते जपावेत, ज्यांना मित्र नसतील त्यांनी ते शोधावेत, मित्राशिवाय जगण्याची वेळ शत्रूवरसुद्धा येऊ नये.

**संकलन : सौ. अपेक्षिता ठिपसे,**
**माजी प्रशिक्षण प्रमुख, बँक्स्‌ असोसिएशन, पुणे**
**प्रा. श्री. शिवाजीराव भोसले यांच्या 'जागर' या पुस्तकातून**

# कैलास मान सरोवर यात्रा

**पशुपतीनाथ येथील मंदिर**



वन्दे देवमुमापतिं सुरगुरुं वन्दे जगत्कारणं, वन्दे पन्नम भुषणं मृगधरं वन्दे पशूनां पतिं।
वन्दे सुर्यशशांकवन्हिनयनं वन्दे मुकुंदप्रियं, वन्दे भक्तजनाश्रयं च वरदं वन्दे शिवम शंकरं।।
कैलास मानसरोवर महात्म्य:
१) कैलास पर्वते राम, मनसा निर्मितम परम, ब्रह्मणा नर शार्दूल , तेनेदाम माणसं सर:
(वाल्मिकी रामायण, बालकांड, २४/८)
२) ततो गच्छेत राजेंद्र मानसं तीर्थमुत्तमम, तत्र स्नात्वा नरो राजन रुद्रलोके महीयते
(महाभारत, वनपर्व, ८२, पद्मपुराण, आदी पर्व २१/८)
कैलास हे अत्यंत रमणीय असे श्री भगवान शंकरांचे निवास स्थान आहे, येथे मनुष्य वस्ती अत्यंत अवघड आहे.
जन्मौषाधितपोमंत्रयोगसिद्धैर्नरेतरै: । जुष्टं किन्नरमन्धर्वैप्सरोभिर्वृतं सदा।।

पहा पान ३२ वर....

पहा पान ३१ वरुन....

(श्रीमत भागवत ४/६/९)

खरं तर कैलास मान सरोवर यात्रा ही एक अत्यंत खडतर अशी यात्रा समजली जाते. केवळ प्रचंड इच्छा शक्ती व प्रचंड आत्मविश्वास ही यात्रा पूर्णत्वास नेतो. मी व माझ्या पत्नीने ऑक्टोबर २०१३ मध्येच ठरवून टाकले की मे २०१४ मध्ये कैलास मान सरोवर यात्रा करावयाची. त्याप्रमाणे आम्ही दोघांनीही रोज ८ ते १० किलोमीटर चालण्याची सवय सुरू केली. खरं तर आम्ही रोज ५-६ किलोमीटर चालतोच. त्यात थोड्या अधिक श्रमाची भर पडू लागली. एक दिवस आड जवळ पासची टेकडी चढण्याची पण सवय करू लागलो. महिन्यातून दोनदा सिंहगड पण चढू लागलो. नोव्हेंबर २०१३ अखेरीस प्रत्येकी रु. ७५,०००/- रघुकुल हॉलीडे या संस्थेत पैसे भरले व आमचे कैलास मान सरोवर यात्रेस जाण्याचे नक्की झाले. जानेवारी २०१४ मध्ये मुंबई-काठमांडू व परतीच्या काठमांडू - दिल्ली - पुणे या विमान प्रवासाचे पैसे भरले व आता ही कैलास मान सरोवर यात्रा नक्की झाली म्हणून खूप आनंदित झालो. वर उल्लेखीलेले चालण्याचे प्रयत्न अधिक जोमाने चालू झाले. नऊ मे ते एकवीस मे असा यात्रेचा कार्यक्रम ठरला.सौ. प्रथमच विमानात बसणार असल्याने, तिची उत्सुकता शिगेला पोहोचली. खरं तर या यात्रेची मूळ कल्पना तिचीच, मी फक्त बरोबर येण्याचे कबूल केले होते इतकेच. ९ मे २०१४ रोजी सकाळी पुण्याहून मुंबईला निघालो व सकाळी ११.०५ च्या विमानाने मुंबईहून काठमांडूला रवाना झालो. आम्ही एकूण या यात्रेसाठी ४१ जण होतो. दुपारी दोन वाजता विमान काठमांडूस पोहोचले. तेथून एका आराम गाडीने शांग्रीला या चतुर्थ तारांकित हॉटेल मध्ये गेलो. २-३ तास विश्रांती घेऊन संध्याकाळी ५ वाजता काठमांडू येथील सुप्रसिद्ध पशुपतीनाथाचे मंदिर पाहण्यास गेलो. या मंदिरास चारही बाजूने मुखे असून प्रत्येक मुखास वेगवेगळी नावे आहेत. पूर्वेला तत्पुरुष, पश्चिमेला सद्योजात, उत्तरेला कामदेव, दक्षिणेला अघोर मुख, केदारनाथ व पशुपतीनाथ यांचे दर्शन घेतल्यास पंच केदारच्या दर्शनाचे पुण्य मिळते. मंदिराजवळ असणाऱ्या दुकानांमधून एक ते चौदा मुखी रुद्राक्ष, विविध आकाराचे स्फटिक, त्यांच्या माळां व देवांच्या अनेक जुन्या मूर्त्या विक्रीस उपलब्ध होत्या. विशेष म्हणजे तेथील विक्रेत्यास अनेक भाषा येत होत्या. तेथून आम्ही बुढा नीलकंठ म्हणजे शेषशायी विष्णू पाहण्यास गेलो. ही मूर्ति अत्यंत विलोभनीय, उत्तम कलाकुसर असणारी व प्रेक्षणीय आहे. जवळच एक मोठ्या कमळा सारख्या फुलाचे झाड होते. त्याची कळी व फूल दोन्हीही अत्यंत आकर्षक होते. नंतर आम्ही डोर्लेश्वर येथे गेलो. केदारेश्वर येथे वृषभ रूपी शिवाची पाठ असून, डोर्लेश्वर येथे शीर आहे असे मानतात. मंदिर छोटेखानी असले तरी निसर्ग रम्य ठिकाणी आहे. नेपाळ सरकारने नुकतेच १० कोटी रुपये मंजूर केले असून, मंदिर व आसपासचा परिसर विशाल व खूपच छान होईल असा अंदाज आहे. तेथे एक साधू असून, ते पुण्याजवळील पिंपरी येथील रहिवासी आहेत असे त्यांनी स्वत: सांगितले. संध्याकाळी आठ वाजता हॉटेल वर परत आलो. भोजनोत्तर दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची माहिती सांगण्यात आली व रात्री ११ वाजता झोपलो.

**क्रमशः**

**सुहास खानवलकर, पुणे, मो. ९३२६२१५०६०**

WITH BEST COMPLIMENTS FROM

# J.P.F. Metacast Private Limited

Plot No. 7,16 & 32, S.No. 589 & 607, Machhe industrial Estate,
Belgaum 590014. Phone : 0831-2440664,
Fax: 0831-2441069 E-mail : admin@jpfmetacast.com,
Website : www.jpfmetacast.com

- 1st ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007
- Winner of Jayaswal Neco Quality Award 2012
- Manufacturers of CI & S G I, machined & unmachined Castings.
- ISO 9001:2008 COMPANY
- Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Componant & Intricate Castings, Cylinder Heads.